नोव्हेंबर १९७१

किंमत एक रुपया

# श्री साईलीला



# श्रीसाईलीला - नोव्हेंबर १९७१


मराठी व हिंदी विभाग :

१ विचारमौक्तिक

२ कविता— (१) श्रीसाईश पदांबुजीं नित रमो, भृंगापरी मन्मती।
(२) निश्चय
(३) तीर्थ यात्रा
(४) रूप ॐ काराचे
(५) साईभजन
(६) ज्ञानासारखे ज्ञान

३ गीतेचे सारभूत मार्गदर्शन–लेखांक १२ वा

४ मराठीचे महाकवी–पूर्वार्ध

५ महात्माजींचे पुण्यस्मरण

६ हिमालयाची यात्रा

७ उचलली जीभ

८ साईलीलेचे आश्रय दाते

९ ग्रंथपरिचय श्रीसाईमहिमा

१० पुण्यतिथी उत्सव

११ श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी, वार्षिक अहवाल, १९७०

१२ श्रीसाईबाबा चरित्र (हिंदी)

इंग्रजी विभाग :

1 Editorial

2 Thoughts to ponder over

3 Maha Samadhi Day Celebrations

4 Message by Swami Kesavaiahji

5 The key to Self-knowledge

6 True Love



# श्री सा ई वा क्सु धा

धर्माधर्म जाणेना । ईश्वर कोण हें ओळखेना ॥
मनीं न उपजे सद्वासना । त्यासी बद्ध म्हणावे ॥
साधु संत सज्जन । यांतें न ओळखी ज्यांचें मन ॥
प्रपंची जो तल्लीन । तोही बद्ध जाणावा ॥
आपुली वाढविण्या थोरी । उगीच दुसऱ्यांची निंदा करी ॥
सोंग साधूचें घेऊनि वरी । करी अनीति तो बद्ध ॥
जो मित्राचा द्रोह करी । जो गुरूशीं वैर धरी ॥
विश्वास महावाक्यावरी । ज्याचा नसे तो बद्ध ॥
नाना ग्रंथ भाराभर । करुनियां पाठांतर ॥
ज्याचे न होय शुद्ध अंतर । तोही बद्ध जाणावा ॥

—ह. भ. प. दासगणूमहाराजकृत अर्वाचीन भक्तलीलामृत, अ. ३३.

---


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक. ]

वर्ष ५० वे ] नोव्हेंबर १९७१ [ अंक ८ वा

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. १० ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

**साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४**

# विचारमौक्तिक

( १ )

"नमन म्हणजे पूजन, मौन म्हणजे उगी रहाणे, आणि ध्यान म्हणजे त्याच्याकडे पहात रहाणे. एकाग्रतेने पहात रहाणे. ज्ञानाने ज्ञानाकडेच पहात रहाणे. ज्ञानावर ज्ञान ठेवून त्याची पूजा करणे, ज्ञानावर आपण असल्याचे ज्ञान ठेवणे म्हणजे निश्चय द्विगुणित करणे, घट्ट करणे, त्याच्यानेच ते प्रसन्न होते. खुष होते. आपण असल्याचे ज्ञान हे इकडे आप्तपणाने आत्मज्ञान. बाहेर सभोवार दिसते म्हणून हे आपण असल्याचे ज्ञान. हाच जगाचा जगद्‌गुरु. जगाचा उत्पत्ति, स्थिति, लयकर्ता हा महेश्वर आहे असे आपल्या ध्यानाच्या ध्यानात आणून देणे. असे वृत्त, अशी योग्यता, असे सामर्थ्य, अशी आठवण, असे स्मरण आपल्या ध्यानाच्या ध्यानात आणून देणे. असे ध्यानात आणून देऊन त्याला असेच ध्यान धरून रहा म्हणून सांगणे, अशा ध्यानाने वावरणे.

. . .　　. . .　　. . .　　. . .　　. . .

"मी देहरूप आहे हे मनांत केव्हाही वापरू नये. मी देह आहे हे न-मन, अगोदर हे मानू नको असा अर्थ घ्या. मी देह आहे, असे मनात आता येत नाही. साधूला असे करून ( हात जोडून ) पळाला ते नमन नव्हे. मी देह आहे, असे मन आता स्पर्श करीत नाही. मी देह आहे असे न म्हण. मी देह आहे असे न –मन. आता मन तसे राहिले नाही. हे मुख्य मन त्याच्याने निजात्मज्ञान, जगद्‌गुरु प्रसन्न होतो. आता तुम्हीच सांगा. स्वरूपज्ञानी, ज्ञानस्वरूप गुरु वडील आहे की जगद्‌गुरु वडील आहे ? तुमच्या अनुभवाने सांगा. स्वरूपाचे ठायी म्हणजे आपल्या ठायी ज्ञानस्वरूप ईशत्व नाही. म्हणजे मुख्य तत्त्व नाही. ज्ञानस्वरूप मुख्य तत्त्व नाही. जगद्‌गुरु विशेष तत्त्व आहे. पण कशाने म्हणावे ? आधी स्थूल की आधी सूक्ष्म ? मग कोणाहून कोण वडील ? बस तर मग. हा परमार्थ मार्ग आहे उलटा. ऊर्ध्व गतीचा म्हणजे उगमाकडे जातो. बाकी सर्व मार्ग आहेत ते प्रवाही आहेत. खालच्या बाजूने हा उगमाकडे वरती चढतो. ह्याला धारेवर धरून आत्मलक्षण अशा विचाराने, अशा ध्यानाने ज्यांनी यास पूजनाला घेऊन याचे अखंड असे पूजन चालविले आहे त्यांना मूळची पूर्णता प्राप्त होणे म्हणजे अगदी सुलभ आहे. ज्यांना ती सुलभ झाली ते सांगतात की फुलाची पाकळी कुस्करावयास जेवढा वेळ लागतो तेवढासुद्धा वेळ याच्या पूर्ण प्राप्तीस लागत नाही. परंतु सद्‌गुरुवचनी विश्वास हवा. आणि आत्मज्ञान जगद्‌गुरुशी सखा व्हावे लागते. साधुसंतांचा हाच हेतू आहे. तुम्ही म्हणून जे काय आहात तेच अनंत असणार आहे. ते तुमच्या ध्यानी येऊ द्या. आणि हे ध्यान तुम्ही रात्रंदिवस अशा ओळखीने, अशा आठवणीने, अशा स्मरणाने, उपयोगात आणा की त्यायोगे तुमची सर्व पीडा जाऊन तुम्ही संतोष पावाल तृप्त व्हाल, व मी चिरायु झालो असा विश्वास तुमच्या ठिकाणी निर्माण होईल."

— **श्रीनिसर्गदत्त महाराज,** विवेक की निरूपण, पृ ९ ते १२

( २ )

## वाङ्मयभक्त :

"तात्पर्य, सरस्वतीची भक्ति करूं पहाणाऱ्यानें स्वतःस केवल सारस्वतांत गुरफटून घेऊं नये. प्रत्यक्ष सरस्वतीमातेला आपले भक्त रांगत्या अर्भकाप्रमाणें आपल्या भोंवतीं घिरट्या घालीत आहेत हें पाहून बरें वाटेल कीं काय ह्याबद्दल मला शंका वाटते. माझ्या भक्तांनीं जन्मभर माझ्या भोंवतालींच न फिरतां बाह्य विश्वात जाऊन तेथील हरतऱ्हेची शोभा पहावी, आपल्या सवंगड्यांबरोबर हरतऱ्हेचा आनंदोपभोग घ्यावा, हरतऱ्हेचा पराक्रम करावा, तेज दाखवावें, सत्य-सौजन्य-सौंदर्यादिक ध्येयानुसार तत्वनिर्मिति करावी, किंबहुना विश्वामित्राप्रमाणे अपर सृष्टीच निर्माण करावी, साहस करून श्री मिळवावी, व मग कलाविलासाकरतां, काव्यशास्त्रविनोदाकरतां, सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्याकरतां, माझ्याभोंवती सर्वांनीं जमावें असें ती म्हणेल.

......आपण वाङ्मयभक्तांनीं आतां शब्दक्रीडा किंवा शब्दशौर्य हें आपलें ध्येयच नाहीं हें स्पष्टपणें, निर्भीडपणें व निर्भयपणें ओळखले पाहिजे. वाङ्मयसेवक म्हणजे पुष्कळांना असें वाटतें कीं, तो शब्दांशी खेळणारा किंवा शब्दांचा कीस काढणारा गरीब बिचारा प्राणी आहे. ही लोकांची कल्पना दूर केली पाहिजे. 'शब्दपांडित्य' हें आपलें ध्येय राहिलें नाहीं हें जगाच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे. आपण शब्द वापरावेत, पण त्या शब्दांपाठीमागें आचारविचारांचें तेज व पावित्र्य पाहिजे. वाङ्मयसेवक हे गरीब बिचारे, भोळेभाबडे, व्यवहार न समजणारे, समाजाशी संबंध न ठेवणारे व श्रीमंतांच्या आश्रयावर कसे तरी पोसले जाणारे, निरुपद्रवी व निरुपयोगी लोक आहेत अशी कांहीं लोकांची जी कल्पना झाली आहे ती दूर केली पाहिजे. त्यांना आपल्याबद्दल आदर वाटूं लागला पाहिजे. दुर्जन असतील त्यांना आपली भीति वाटली पाहिजे !

"असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणें व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें आपलें अवतार-कृत्य आहे. अर्थात् कंसादिकांना ज्याप्रमाणें कृष्णाची भीति वाटत होती त्याप्रमाणेंच दुर्जनादिकांना आपली भीति वाटली पाहिजे. दौर्जन्य कोठेंहि व कोणत्याहि क्षेत्रांत असो, तें आपणांस असह्य झालें पाहिजे. अन्याय हा सरकारचा असो, ब्राह्मणांचा असो किंवा ब्राह्मणेतरांचा असो, तो नाहींसा करण्याकडे वाङ्मयाची प्रवृत्ति झाली पाहिजे. हे काम निर्भयपणें झालें पाहिजे. परतंत्रता कोठल्याहि क्षेत्रांतील असो, ती सामाजिक असो, धार्मिक असो, वाङ्मयात्मक असो, आपणांस ती अवंद्य असली पाहिजे व सर्वांना ती अवंद्य होईल अशी आपली वाङ्मयप्रवृत्ति असली पाहिजे. दास्य राजाचें

असो, संस्थानिकाचें असो, स्त्रीचें असो, किंवा पुरातन शास्त्राचें असो, त्याचें निर्मूलन करण्यास आपण प्रवृत्त झालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रिमूर्तीचें ध्यान, भजन व पूजन आपण केलें पाहिजे व कृत्रिम रूढि, परंपरा संकेत, इत्यादिकांचें दास्य, वर्चस्व किंवा बंधकत्व पार झुगारून दिलें पाहिजे व झुगारून देण्यास लोकांस शिकविलें पाहिजे. हे व्रत आपण स्वीकारलें व आपली वाङ्‌मयात्मक तपश्चर्या या ध्येयाला अनुसरून झाली तर तुष्टि, पुष्टि व शांति यांचा लाभ आपणांस व जगास मिळून दैवी संपत्तीचें जगांत साम्राज्य होईल व उच्चतम कलाविलासांत रममाण होऊन अलौकिक अशा सात्विक आनंदाचे आपण वांटेकरी होऊं."

–प्रा. **वामन मल्हार जोशी**, **विचारसौंदर्य** पृ. ९७–९८.

( ३ )

## अदृष्ट फलधर्माकडील ओढा :

"आजही आमचा ओढा अदृष्टफलधर्माकडे कसा आहे हे मश्हूर आहे. राष्ट्र-विकास योजनेसाठी कोटी रुपये खर्च करावयाचे ठरविल्यावर सरकारी अधिकारी वर्षअखेर तेवढेच खर्च झाले किंवा नाही एवढेच पहातात आणि ते झाले की धन्यता मानतात. यामुळे समाजाला प्रत्यक्ष किती उपयोग झाला, शेतीचे पीक किती वाढले, ग्रामजनांच्या काही सुखसोयी झाल्या की नाही, याविषयी सर्वथा ते उदासीन असतात. नियोजन सुरु होऊन दहा वर्षे झाली. पण त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात जी वाढ झाली ती कोठे गेली, तिचा उपयोग काय झाला, हे पाहण्याचे कोणास सुचले नाही. कारण फलाविषयी आपण बेफिकीर आहो. भूदानयज्ञवाले तर आता पूर्ण अदृष्ट फलधर्मवादी झाले आहेत.

"दुसरे असे की त्या मागल्या काळाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात मनसबदारी, वतनदारी, मिरासदारी निर्माण झाली आहे, आणि आपल्या सत्ताधीशांनी जनतेला या मिरासदारांच्या स्वाधीन केले आहे. कापडवाले, कागदवाले, रॉकेलवाले यांना सरकार एक आणा भाववाढ करावयास परवानगी देते, ते एक रुपया वाढवितात. मोगली सुलतानांचे मिरासदार हेच करीत. 'जे गावी दोनशे तीनशे होन खंडणी सरकारास द्यावी, ते गावी मिरासदारांनी दीड दोन हजार होन घ्यावे.' (सभासद बखर). सध्या असेच चालू आहे.

"आपल्याला परकीय आक्रमणाचे स्वरूप ओळखण्याचे सामर्थ्य नाही. आक्रमण येणार याची आपणास कल्पनाच येऊ शकत नाही.

आजही चीन आक्रमण करील असे आपल्याला वाटले नव्हते. आक्रमण झाल्यावरही ते क्षूद्र आहे अशीच आपली श्रद्धा होती. त्याचे स्वरूप आपण ओळखू शकलेलो नाही. दर वेळी अजून विस्मितच होत आहो. जुने कागदपत्र काढून त्यांच्या आधाराने पुराव्याने, प्रमाणाने, हिंदभूमीवरचा आपला हक्क शाबीत करताना चीनला माघार घ्यावी लागेल याविषयी आपल्याला शंका नाही.

"धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा या शक्ति आपण आज राजकारणातून काढून टाकल्या आहेत.

...आक्रमक राष्ट्राला तितक्याच कडव्या, जहरी, जळत्या राष्ट्रधर्माने उत्तर दिले पाहिजे हे आपल्या नेत्यांना मान्यच नाही. आमचे राज्य निधर्मी आहे, आम्ही मानवतेचे पुढारी आहोत. यातच ते समाधान व भूषण मानीत आहेत.

...हे असेच चालले तर अकराव्या शतकातील इतिहासाची पुनरावृत्ती होईल की काय अशी शंका येते. म्हणून या वेळी सतराव्या शतकातील पुनरावृत्ती त्वरेने घडवून आणण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे आणि त्या प्रयत्नांना यश यावे अशी इच्छा असेल तर आपण अहोरात्र मंत्र जपला पाहिजे की :

"शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा साक्षेप ॥
शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ॥"

—**डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे**, वैयक्तिक व सामाजिक, पृ-८२-८४

---

(४)

## संत केवळ साहित्यिक होते काय ?

"वाङ्मयात रंजन तर हवेंच. पण त्यात जागृति पाहिजे. समाजांत डोंगरा-एवढे अज्ञान आहे. लक्षावधि लोक झोंपले आहेत. त्यांना कोण उठवणार? जे निजले आहेत त्यांनाच जागें करावें. जे जागे आहेत त्यांना उठवण्यात काय शहाणपण आहे? पुष्कळसे लेखक अज्ञानांना सज्ञान करण्याऐवजी पंडितांना महापंडित करण्याच्यामागें लागलें आहेत. संस्कृताचा आणि पांडित्याचा दंभ माजला म्हणून बहुजनांच्या उद्धारासाठीं मराठी भाषेचें निशाण संतांनी हाती धरलें. मराठीचा पक्ष हा बायाबापड्यांचा आणि स्त्री-शूद्रांचा पक्ष आहे. मराठी लेखकांनी हे कदापि विसरूं नये. समाजातले खड्डे अन खाच-खळगे आधीं भरा. मनोरे कसले बांधताहात? ज्ञानेश्वर म्हणतात :

निम्न भरलियाविणें । सोयि ढळेचि नेणें ।
नेति आता लोपोनि जाणें । सामोरें पा ॥

वाटेतला खड्डा भरून काढल्यावांचून पुढें पाणी वाहात नाहीं. त्याप्रमाणें श्रांत पीडितांना संतुष्ट केल्यावाचून समाजाची प्रगति मुळीं होतच नाहीं. महापुरुषांचें लक्ष खालीं असतें, वर नसतें. ते खालीं पाहून चालतात.

"धर्मानें आणि ज्ञानानें आजपर्यंत अज्ञ जनांचा बुद्धिभेद केला. जीवनापेक्षा मरणाला अन् मोक्षाला त्यांनी महत्त्व दिलें. त्यामुळें वैराग्याचें, जपजाप्याचें नि क्रियाकर्माचें अवडंबर माजलें. तीर्थांचें, देवळांचें आणि मूर्तिपूजेचें प्रस्थ वाढलें. भिक्षुक आणि पुजारी गोरगरीबांना राजरोस लुटूं लागले. म्हणून जनतेच्या उद्धारासाठी संतांना धावून यावें लागलें."

— **प्रल्हाद केशव अत्रे** (आत्रेय १९७१, पृ-५)

(५)

## इच्छा - शक्ति :

"अमरिका के एक विशेषज्ञने, जिसने व्यावहारिक मनोविज्ञान में अनेक अनुसंधान किये हैं, इच्छा-शक्तिके विकास के लिए एक अच्छी युक्ति बतलाई है! आप दिन के किन्हीं भी दो घण्टों को अपनी इच्छा-शक्तिके प्रयोग के लिए चुन लीजिए और इन दो घण्टों में समय विभाजन करके आप अपने लिए एक निश्चित कार्यक्रम बना लीजिए, जिस में एक-एक मिनट का हिसाब हो! फिर लगकर दो-तीन महिने तक बिना किसी अपवाद के इस कार्यक्रम का अक्षरशः पालन कीजिए! संभवतः इस नियत कार्यक्रम से आपको विरत करने के लिए इन दो-तीन महिनों में कितने ही प्रलोभन आएँगे, किन्तु उनमें से प्रत्येक पर विजय प्राप्त करना आपकी इच्छा-शक्ति के परम ध्येय होगा! बाद में प्रयोग की अवधि को आप दो घण्टे से बढाकर तीन या चार घण्टे कर सकते हैं! इस प्रकार मानों इच्छा-शक्ति को व्यायाम का अवसर दे कर आप उसे विकसित होने का अवसर देते हैं!

सुविकसित इच्छा-शक्तिवाला व्यक्ति ही संघर्ष के इस आधुनिक युग में अपने पाँव मजबूतीसे टिका सकता है— जीवन में सफलता प्राप्त करने की क्षमता केवल ऐसे ही व्यक्तियों में पाई जाती है!"

— **श्री. भगवतीप्रसाद श्रीवास्तव**

# श्रीसाईश पदांबुजीं नित रमो, भृंगापरी मन्मती।

कवि—**रमाकांत वि. सरमळकर**

( वृत्त–शा. वि. )

वृत्ती संभ्रमशील त्वां निरसुनी दिव्यत्व या दाविलें।
निश्चैतन्य त्वदीय रम्य प्रतिमेमाझारि आलोकिलें॥
धालें मन्मन देखुनी कृति तुझी विस्मीत झालों अती।
श्रीसाईश पदांबुजीं नित रमो भृंगापरी मन्मती॥ १॥
देवा म्यां श्रविले अनेकविध ते दृष्टांत त्वच्छक्तिचे।
नेत्री लक्षियले मना उमगले ते धाम त्वद्भक्तीचे॥
आतां काहि करी परी मज बरी साई तुझी संगती।
श्रीसाईश पदांबुजीं नित रमो भृंगापरी मन्मती॥ २॥
आहे बाळ तुझा सुकाळ प्रितिचा आबाळ कैंची मला?।
विश्वाचा प्रतिपाळ जो करितसे त्या आळवीतो तुला॥
राहो सांजसकाळ भाळ नत ते त्वत्पादयुग्माप्रती।
श्रीसाईश पदांबुजीं नित रमो भृंगापरी मन्मती॥ ३॥
आहे मंगलमूर्ति कीं रघुपती कीं सांब गंगाधर।
अत्रीनंदन दत्तराज अथवा कीं यादवांचा वीर?॥
नेणे काहि मशी शिशू जननिशी तेवी तुझ्या मागुती।
श्रीसाईशपदांबुजीं नित रतो भृंगापरी मन्मती॥ ४॥

------

# — निश्चय —

कवि : श्री. द. ब. पोतनीस

केला मी निश्चय
शेवटा न जाय
देवावरी काय
राग माझा ॥ १ ॥
संतांचे आखाडी
निश्चयें जायीन
तुझ्याच गुणांचे
पोवाडे गायीन ॥ २ ॥
तुळस फुल झाड
दारी मी लावीन
निश्चयें मी पाणी
नित्य त्या घालीन ॥ ३ ॥
दारीं कोणी येता
अंध मूक प्राणी
निश्चयें मी तयांना
देयीन अन्न-पाणी ॥ ४ ॥
निश्चयें मी केले
नवस सायास
शेवटा न गेली
देवा माझी आस ॥ ५ ॥
तुजवरी देवा
टाकीतो मी भार
नाही मज आता
कुणाचा आधार ॥ ६ ॥
साईराया माझ्या
अन्तरीच्या देवा

निश्चय मनाचा
शेवटास न्यावा ॥ ७ ॥
रहावी मजपाशीं
श्रद्धा अन् सबुरी
तवचरणां पाशी
द्यावी मुक्ति चारी ॥ ८ ॥
राग न धरीन
निश्चये राहीन
सेवेंत निमग्न
तुझ्या मी होयीन ॥ ९ ॥
दहावे कडवी
चालला अश्रुपाट
म्हणोनी करीतो
या गीताचा शेवट ॥ १० ॥

---

# — तीर्थयात्रा —

कवि : श्री. स. कृ. काळे, चित्रकार

भाविक भारावल्या हृदयी करी तीर्थयात्रा
भेटी गाठीत न येई सूत्रबद्धता
जातो धाऊन ऐकून आख्याईका
होतो क्षणात श्रद्धेचा बोजवारा ॥ १ ॥
अनुभव प्रत्यक्षांत निरनिराळे ठाई ठाई
होते सदा श्रद्धेची भूलभुलाई
दर्शने दुरुनच देती समाधान चित्तास
भावनेचा चक्काचूर होतो जाता जवळ ॥ २ ॥
त्रास पुजाऱ्यांचा नजर पैशावर
गरीब श्रीमंत जाणती हळुवार
चीज पैसा ही, सर्व श्रेष्ठ सर्व क्षेत्रात
त्यावर दुनिया चाले पवित्र स्थानात ॥ ३ ॥

बिसतात अनेक ओंगळ प्रकार क्षेत्रात
स्थान पावित्र्याचे, भ्रष्टाचार हातो हात
ओघ पैशाचा भाविका हातून सहज
कधी बळजबरी धार्मिक भीति सांगून ॥ ४ ॥
असेल त्यात यात्रेकरू करी खर्च
अन्नदान दक्षिणारूपे सांभाळी सर्व
श्रद्धेत निर्माण होई अश्रद्धा यात्रेत
मानवच कारणीभूत होती स्थानात ॥ ५ ॥
पावित्र्याचे नावाखाली पहाणे होते स्थान
सहलीचे पुण्य फक्त सहज पदरात
जागता पहारा अणुरेणूत परमेशा
यात्रिक भाविकास क्षेत्री दे आशा ॥ ६ ॥
स्थानाचे स्थानमहात्म्य जागोजागी
परमेशा तीच मिळुदे क्षेत्रात बिदागी
आनंदाची किमया लाभू दे सर्व स्थानांत
पुण्य यात्रेचे पुरे पूर येऊ दे हातात ॥ ७ ॥

------

# रूप ॐ काराचे

कवि : स. कृ. काळे, चित्रकार

आहे सुटसुटीत साधे अक्षर
अर्थपूर्ण भाषेचा प्रकार
गुढार्थ भरला अनंताचा
डौल सुटसुटीत मोलाचा ॥ १ ॥
व्यवहार जगतातील शब्दा मुळेच
अर्थ कमि अधिक नेमकेच
आंधळया मुक्या बहिऱ्यांचीही भाषा
ॐकारा मुळेच अर्थ बोध होतो तिचा ॥ २ ॥
असा हा व्यापार शब्दांचा जगतात
आत्मोन्नती सुसंगत साधण्यात
आध्यात्म्यातील रूप ॐ काराचे
जीविताचे सार्थकास लाभायाचे ॥ ३ ॥

------

# साई भजन

कवि : श्री. मा. ल. पाडगायकर.
(चाल : जय जय गुरु महाराज गुरु)

जय जय गुरु महाराज गुरु
जय जय साईनाथ सद्गुरु
तूं माय माझी मी लेकरूं
तूं कामधेनू मी वासरूं ॥ ध्रु० ॥
तूं अविनाशी अनंत अक्षय
निर्ब्रह्म निर्द्वंद्व निरामय
ऋचांऋचांतुनि वेदचतुष्टय
स्तुतीस तव लागती मुखरूं ॥ १ ॥
विधिरूपें तूं विश्व निर्मिलें
विष्णूरूपें सुंदर केलें
अंति वाजवुनि प्रलया नेलें
रुद्राचा डम् डम् डमरू ॥ २ ॥
ध्यानमग्न तूं साई दिगंबर
चामर ढाळी शिरि औदुंबर
आलोकित मुखि कोटीभास्कर
मूर्ति मनोहर नयनिं भरूं ॥ ३ ॥
मायेचा अंधार चहूंकडे
मृगनीराचे दुथडीं ओढे
घालुनि जाती तुला सांकडें
कैवल्याचे वाटसरू ॥ ४ ॥
कळिकाळाचा अवघा डेरा
एल्गाराचा देइ इषारा
तुजविण साई! कुठें न थारा
पडते उघडी बघ अबरू ॥ ५ ॥
दीनजनांचा तुला कळवळा
पतितांचा नच ये कंटाळा
भक्तजनांचा सदा उमाळा
मुमुक्षितांनां कल्पतरू ॥ ६ ॥
साईपदांचे सेवूं तीर्थ
साईभक्तिची लावूं शर्थ
प्रपंचांत साधूं परमार्थ
सुखेनैव भव पार करू ॥ ७ ॥
तल्लीन होऊं साईभजनीं
ब्रह्मानंदीं टाळी लावुनी
नाचूं थय थय भान हरपुनी
बांधुनिया चरणीं घुंगरू ॥ ८ ॥

# ज्ञानासारखे ज्ञानच !

कवि :- श्री. तु. गं. चव्हाण अॅडव्होकेट-मुंबई

श्रीमद्‌भगवद्‌गीता हा एक अमर ग्रंथ आहे आणि भारतीय मनावरील त्याचे आकर्षण आधुनिक काळातही कोणत्याही प्रकाराने कमी आलेले नाही. आजच्या काळातही तरुण सुशिक्षित मंडळी गीतेने आकर्षली जातात, ती समजून घेण्याचा प्रयत्न करतात, आणि मग आपापल्या परीने ती आपणांस कशी समजली आहे हे लोकांस दर्शविण्याचा प्रयत्न करतात. आणि म्हणूनच गीतेचे आतापर्यंत निरनिराळया भाषांत अनेक अनुवाद झाले असले, तिच्यावर अनेक टीका-ग्रंथ झाले असले, तरी त्यांत सारखी भरच पडत आहे आणि हे अत्यंत इष्ट आहे. तीन वर्षांपूर्वी मुंबईतील एक तरुण कायदे पंडित, श्रीयुत तुकाराम गंगाराम चव्हाण, यांनी गीतेचा आधुनिक सोप्या मराठीत सुगम असा अनुवाद करून मराठी भाषिकांस 'गीता-दर्शन' या नावाने सादर केला आहे. या अनुवादाबद्दल भागवत सांप्रदायाचे आधुनिक काळातील संत श्री स. के. नेऊरगांवकर लिहितात :

"गीतेच्या श्लोकांचा आपण काव्यमय अनुवाद सोपा सुटसुटीत व सुबोध केला आहे. क्लिष्टता त्यांत नाहो. प्रसादगुण प्रगट झाला आहे. शिवाय गीतेच्या श्लोकाचा अर्थ मी जो पाहिला त्यांत मला चूक आढळून आली नाही."

श्रीयुत बाळासाहेब भारदे म्हणतात की हा अनुवाद मूळ आशयाला धरून करण्याचा उद्देश लेखकाने बऱ्याच अंशी सफल केला आहे याबद्दल शंका नाही, सामान्य वाचकांना हा अनुवाद वाचून गीता-दर्शन होईल व त्यांच्या जीवनाला चांगले संस्कार मिळू शकतील अशी उमेद वाटते.

या तरुण उत्साही गीतानुवादकाने श्री साईलीलेच्या वाचकांसाठी गीतेतील 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' या श्लोकावरील श्री ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचा सुगम अनुवाद करून सादर केला आहे, तो आम्ही पुढील पानावर देत आहोत.

– संपादक

म्हणून असे न घडे विचारांती असंगतीच दिसे ।
ज्ञानापुढे तुलना नसे कसली पवित्र तेचि दिसे ॥
इथे ज्ञानच उत्तम दुसरे न होई त्यासारखे काही ।
जसे चैतन्यावीण दुसरे नसे जगी पाही ॥
महातेजाच्या कसाने प्रतिबिंब चोखाळता दिसे ।
की आकाशा देता आलिंगन आकाशच असे ॥
नातरी पृथ्वीएवढे कंटाळवाणे जरी जोडे ।
तरीच पांडुकुमरा उपमा ज्ञानास देणे घडे ॥
म्हणून पुष्कळ तऱ्हेने पहाती पुढे पुढे निर्धार होता ।
ज्ञानाचे ठिकाणी ज्ञानास असे पवित्रता ॥
चव अमृताची निवडता अमृतासारखी म्हणे ।
तसे ज्ञानही जाण ज्ञानासारखे निश्चितपणे ॥
आता यावरी बोलणे ते अवघे वेळ घालविणे ।
पार्थ तोच म्हणे देवा सत्य आपले बोलणे ॥
परंतु तेच ज्ञान कसे जाणावे ते अर्जुनाने विचारावे ।
आणि तेच मनोगत ओळखले देवे ॥
मग म्हणे किरीटी दे रे चित्त या गोष्टीशी ।
सांगेन ज्ञानाच्या भेटीचा उपाय तुजशी ॥

------

# गीतेचे सारभूत मार्गदर्शन—

लेखांक १२ वा.

डॉ. रा. य. परांजपे

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥**

मागील लेखाच्या शेवटी ज्ञानी आणि भक्त यांच्यातील फरक दाखविण्यात आला आहे. तोच भाग अधिक स्पष्ट करण्यासाठी अधिक विवेचन करणे अगत्याचे आहे. आत्मज्ञान झाले म्हणजे सर्वत्र ब्रह्मभाव होतो. अद्वैतसिद्धि हाती येते. द्वैताचा लवलेशही उरत नाही. सर्वत्र आत्मत्वाचाच प्रत्यय येतो.

**तैसा आत्मत्वें वेष्टिला होय । तो जया जया दृश्यातें पाहे ।**
**तें दृश्य द्रष्टेपणेंसि होत जाये । तयाचेंचि रूप ॥** ज्ञा. १८-४१०

आत्मत्वानेच सर्व विश्वाचा प्रत्यय येणे यालाच यथार्थ ज्ञान असे म्हटले जाते. बाकीचे ज्ञान हे विपरीत ज्ञान, अन्यथा ज्ञान किंवा अज्ञान म्हटले जाते. म्हणूनच गीतेत म्हटले आहे :

**'आत्मवत् सर्वभूतानि यः पश्यति स पश्यति'**

ज्ञानाच्या डोळ्यांनी डोळस झालेला तोच खरा द्रष्टा. तो सर्व विश्व आपल्याहून निराळे पहातच नाही. चामडयाच्या डोळयांनी पहाणारे या एकत्वात सर्वत्र भेदच पहातात. सर्व विश्व चिन्मय असूनही देहबुद्धीमुळे त्याला जडच वाटते. देह-बुद्धी जाऊन जेव्हा आत्मबुद्धी होते तेव्हा त्याला तेच विश्व आत्मवत् दिसू लागते. परंतु ही सर्वत्र आत्मविलासाची दृष्टि व आत्मत्वाचा भोग विशेष मानला नाही. म्हणून पुढे म्हटले आहे :

**मग याहीवरी पार्था । माझिया भजनीं आस्था ।**
**तरी तयाते मी माथां । मुकुट करीं ॥**

नुसत्या आत्मज्ञानात परिपूर्णता झाल्याप्रमाणे वाटते, परंतु ती खरी पूर्णता नव्हे. द्वैतभावाची ती सापेक्ष स्थिति असते. द्वैत आणि अद्वैत ही सापेक्ष आहेत. द्वैतभाव जाईल तरच अद्वैतभाव येईल. खरी परमात्म-स्थिती ही द्वैताद्वैतातीत आहे. द्वैत आणि अद्वैत या भावांना ती आश्रयभूत आहे. दोन्ही भावना वस्तुतः तिचाच विलास आहे. म्हणून अद्वैत स्थिति ही ज्ञानमय, आनंदमय असली तरीही भगवंत तिला विशेष मान देत नाहीत. म्हणून ज्ञानोत्तरही द्वैताद्वैत भावांच्या पलीकडे

असलेल्या परमात्म्याला शरण गेलेला त्याचा लाभ झालेला ज्ञानी भक्त भगवंताला विशेष आवडतो. भगवान म्हणतात मी त्याला आपल्या मस्तकावर मुकुट करतो, त्याला डोक्यावर घेऊन नाचतो. सर्व विश्व माझे घर म्हणणाऱ्या ज्ञान्याला भगवान डोक्यावर घेत नाहीत, तर हे विश्व भगवंताचे घर आहे असे मानणारा भक्तच भगवंताला अत्यंत प्रिय असतो. आपणाला जर आपणच परमेश्वर व्हावे असे वाटत असेल तर तेथे खरी भक्ति मूळच धरणार नाही, साधना करून मी परमेश्वर झालो हा अनुभव असेल तरीही भक्तापुढे या ज्ञान्याची महती भगवान कमीच लेखतात. ज्ञानी आणि भक्त यांतील अंतर साधुसंतांनी अनुभवाने जाणले आहे.

मी भगवंतच आहे आणि मी भगवंताचा आहे या दोन भावनांमध्ये मी भगवंताचा आहे ही भावना देवाला अत्यंत प्रिय आहे असे आपण पाहिले. परंतु आपल्यापुढे प्रश्न असा उभा रहातो की यांतील वास्तविक सत्य काय आहे? भगवंताला आवडते म्हणून आपण भक्त व्हावयाचे का ते सत्य आहे म्हणून व्हावयाचे?

वेदांतशास्त्र सांगते 'तत्त्वमसि' तत्-त्वम्-असि-तेंच तू आहेस, तू प्रत्यक्ष परब्रह्मच आहेस. हे वेदांतमत खोटे आहे काय? अनेकांनीं याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. भगवद्भक्त म्हणून सर्वश्रेष्ठ अशा ज्ञानोबा तुकारामादी संतांच्या वचनांतूनही हे भाव व्यक्त झालेले दाखविता येतील. आणि भगवानही सांगतात :

**मी होऊनि मातें । सेवणें असे आइतें ।**
**तें करीं हाता येतें । ज्ञानें येणें ॥**

यावरून भगवंत होऊन भगवंताची भक्ति करावी असे भगवंताचे मत दिसत आहे. म्हणजेच आपणाला भगवंत होता येते. तेव्हा आम्ही प्रथम भगवंत होऊ आणि मग भक्तीचा विचार करू. तो पर्यंत भक्ति-श्रेष्ठ म्हणत बसून उपयोग काय? आणि या ज्ञानाच्या विचारसरणीप्रमाणे जर आपणच परब्रह्म आहोत तर आपण भक्ति तरी कोणाची आणि का करावी?

भक्तीचा नुसत्या शब्दज्ञानाने विचार केला तर वरीलप्रमाणे अनंत शंका घेता येतील. मी भगवंत आहे का भगवंताचा आहे याचें उत्तर भक्तिशास्त्र-दृष्ट्या निःसंदिग्ध देता येते. सगुण आणि निर्गुण या दोन्ही दृष्टींनी या प्रश्नाचा स्वच्छ उलगडा होऊ शकतो. प्रथम आपण सगुण भक्तिशास्त्रानुसार विचार करू. नंतर निर्गुण अशा ज्ञानबोधाच्या दृष्टीनें विचार करू. दोन्ही दृष्टिकोनांतून भक्ति हीच सर्वश्रेष्ठ आहे, सगुण-निर्गुण भक्तींत कमजास्तपणा नसून भेद फक्त शब्दमात्रच आहे. आपण भगवंताचे आहोत ही विचारसरणी कशी योग्य आहे हे प्रथम पाहू.

मला शरण या असे म्हणणारे भगवान हे पूर्णावतार आहेत, अनंतकोटि-

ब्रह्मांडनायक आहेत, आपण आपल्याला पूर्णावतार म्हणू शकतो का? 'कर्तुमकर्तु-मन्यथाकर्तुं' अशी आपली शक्ति आहे काय? अनंतकोटिब्रह्मांडनायक असे कोणी आपणाला म्हटले तर ते अगदी बरोबरच आहे अशी ग्वाही आपले मन आपल्याला देईल काय? अर्थातच सगुणाच्या दृष्टीने मी भगवंत आहे असे म्हणणे जीवाला योग्य नाही. तेव्हा आपणच भगवंत आहोत असे मानणे अगर म्हणणे हे अत्यंत चूक आहे हे आपण नीट लक्षात घेतले पाहिजे. आपण जर खरोखरच भगवंतच असाल तर तसे म्हणणे भगवंताला आवडले असते. पण तसे नाही. कल्पना करा, असे अनंत भगवान झाले असते, तर मग विश्वावर सत्ता कोणी चालवावयाची? धर्मरक्षणासाठी कोणी अवतार घ्यायचा? विश्वाची स्थिति निर्नायकी होईल. एका राष्ट्रात ज्या प्रमाणे एकच केंद्रीय सत्ता पाहिजे त्याप्रमाणे एका शरीरात एकच जीवात्मा पाहिजे. ते अनेक झाले तर व्यवहार काय होईल? थोडा वेळ पिशाचाचा संचार झाला तर काय होते हे आपण पहातोच. त्याच प्रमाणे विश्वात 'कर्तुमकर्तृ-मन्यथाकर्तुं' अशी एकच सत्ता पाहिजे. त्यालाच अनंतकोटिब्रह्मांडनायक म्हणतात.

या अनंतकोटिब्रह्मांडनायकाच्या साम्राज्यात अनेक देव आणि देवता विशिष्ट शक्तिसंपन्न असून त्या आपल्या उपासकांना पावतात असा अनेकांना अनुभव आलेला आहे व अनेकांची या देवदेवतांवर श्रद्धाही आहे. हे कसे होते? एका राष्ट्रात एक केंद्रसत्ता असून तिच्या अंतर्गत, प्रांत, जिल्हा, तालुका, खेडे, येथ-पर्यंत कम-जास्त अधिकाराची सत्तास्थाने निर्माण होतात, परंतु या सर्वांचा विचार आपण त्या सर्व एका राजसत्तेच्या आहेत असे समजूनच करतो. राज्य यंत्रणेत कोठे सदोषता आढळली तर आपण राजसत्तेकडे तक्रार करतो. त्याचप्रमाणे भगवान म्हणतातः "तुम्ही सुख लागत नाही या तक्रारी घेऊन विश्वात कोणालाही शरण गेलात तरी तुमची तक्रार संपूर्णतः दूर केली जाणार नाही. त्याकरता तुम्ही मलाच शरण या. आणि ज्या काही अल्पस्वल्प तक्रारी इतर देवतांकडून दूर होतात असे तुम्हाला वाटते ते वस्तुतः सत्य नव्हे. कारण त्यांच्याद्वारा वस्तुतः मीच तुमची इच्छा पूर्ण करीत असतो.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥** भ. गी. ७-२१

भगवान म्हणतात, मनुष्य ज्या श्रद्धेने प्रवृत्त होऊन ज्या ज्या देवतांची पूजा करण्याची इच्छा करतो त्या त्या इच्छा भावनांच्या अनुग्रहानेच पूर्ण होतात व त्यायोगे त्या त्या देवतांवरील त्याची श्रद्धा ही दृढ होत जाते. परंतु हे भजन किंवा भक्ती ही भगवंताला खरोखर प्रिय आहे काय? नाही. भगवंताला हे भजन अविधिपूर्वक वाटते. भगवान म्हणतातः

**येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ॥**
**तेऽपि मामेव कौंतेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ भ. गी. ९-२३**

अन्य देवदेवतांची भक्ति करणारे वस्तुतः माझीच भक्ति करीत असतात. कारण सर्वांचा फलदाता मीच आहे. परंतु निरनिराळया देवतांवर निराळी श्रद्धा ठेवून केलेले भजन हे न समजून केलेले अज्ञानजन्य भजन असल्यामुळे ते अविधिपूर्वक होते. भगवंतांना विधिपूर्वक भजन घडावे असे वाटते. निरनिराळया देवतांच्या ठिकाणी असलेले सामर्थ्य हे त्या भगवंताचे आहे. विश्वामध्ये जे सामर्थ्य दिसून येते त्या सामर्थ्याचा मूळ उगम भगवंतापासूनच आहे. आपल्या ठिकाणी देखील काही शक्ति आहे. आपणही काही करू शकतो. परंतु ते सामर्थ्य तरी आपण कोठून आणले ? म्हणून आपल्या स्वतःबद्दलही आपण असेच समजले पाहिजे. माझ्या ठिकाणी असलेली ज्ञानशक्ति वा क्रियाशक्ति ही त्याचीच आहे. आम्ही त्याचे आहोत तशीच भावना सर्व देवदेवतांच्या विषयीही असली पाहिजे. येथे ओघानेच असा विचार येतो की ज्याप्रमाणे अज्ञानामुळे किंवा अहंकारामुळे आपण आपल्या सामर्थ्याची सत्ता ही आपलीच आहे, यांत देवाचा संबंध नाही असे समजून चालतो त्याचप्रमाणे देवदेवतांनाही जर त्यांचेठिकाणी असलेली सत्ता ही आपलीच आहे असे वाटते तर ते त्यांचेही अज्ञान आहे, तो त्यांचाही अहंकार आहे, त्यांनी त्या भगवंताची सत्ता मानून निरहंकार होणे त्यांच्याच हिताचे आहे असे नाही का ? भगवंताने इंद्र, ब्रह्मदेव यांचा गर्वपरिहार केल्याचे वर्णन भागवतात आलेले आहे. त्यांतील भाव या दृष्टीने लक्षात घेणे आवश्यक आहे. अनेक क्षुद्र देवतांबद्दल साधुसंतांनी तुच्छतेचे उद्गार काढले आहेत. त्याचे कारण म्हणजे त्यांना त्यांच्या सामर्थ्यातून अहंची बाधा झालेली असते हेच आहे. अशा देवतांनाही उपदेश करणे आवश्यक आहे की, देवहो तो मोठा देव ओळखा. त्याची भक्ति करा. भगवान श्रीकृष्णाच्या ठिकाणी सर्व विश्वातील, अर्थात् विश्वातील सर्व देवदेवतांनी सुद्धा आपण त्याला शरण गेले पाहिजे ही धारणा ठेवली पाहिजे. इतर देवदेवता राहोत परंतु ज्यांना आपण महादेव म्हणतो अशा शंकरांबद्दल ही त्यांचे काय उद्गार आहेत ?

**करितां तापसांची कडसणी । कवण जवळा ठेविजे शूळपाणी ॥**
**तोहि अभिमान सांडूनि । पायवणी माथां वाहे ॥**

शंकरांनांही तपश्चर्येचा मोठा अभिमान झाला होता. त्यांना वाटले मी मोठा देव आहे. मला महादेव म्हणतात. मला तपश्चर्येच्या जोरावर भगवंताने दर्शन दिलेच पाहिजे. खूप तपश्चर्या केली. त्यांच्या लक्षांत आले. माझा अहंकार नडतो आहे. तपश्चर्येने मी तपस्वी हा अहंकारच वाढला. भगवंताजवळ यत्किंचितही अहंकार

नाही. माझ्या मोठेपणाची तपश्चर्येची किंमत शून्य आहे. मग त्यांनी काय केले? सर्व अभिमान सांडून भगवंताच्या पायापासून निघालेले गंगोदक आपल्या मस्तकावर धारण केले. आणि एवढे झाल्यावर या भक्तोत्तमावर भगवान संतुष्ट झाले. भक्ताचे भक्त झाले. आणि त्यामुळे भगवान शंकरांना एवढी मोठी योग्यता प्राप्त झाली की त्यांना प्रत्यक्ष भगवान श्रीहरि इतका मोठेपणा प्राप्त झाला.

हरि हरां भेद नाहीं । नका करूं वाद ।

असे त्यांचे आंतरिक ऐक्य झाले: मी सर्वांहून श्रेष्ठ असल्यामुळे सर्वांनी मलाच शरण यावे असे एक भगवान श्रीहरीच म्हणू शकतात. एवढा मोठा अभिमान त्यांनांच खपू शकतो. हा अभिमान यथार्थ असल्यामुळे तो त्यांना बाधा करू शकत नाही. खोटा अभिमान हाच सर्वथा बाधक असतो.

आपल्यालाही हाच अभिमान नडतो. हे सहसा कोणाच्या लक्षात येत नाहीं. शंकरासारखी आपली तपश्चर्या आहे काय? पण आपण नाना तऱ्हेची साधने करून परमेश्वराला वश करण्याच्या प्रयत्न करतो. वेदशास्त्रांनी आमच्यापुढे साधनाचा जणु डोंगरच उभा करून ठेवला आहे. यज्ञ, दान आणि तप यांचे विविध प्रकार सांगितले आहेत. परंतु यांचा परमेश्वरप्राप्तीच्या कामी काडीचाही उपयोग होत नाही. भगवंतांनी अर्जुनाला या साधनांचा फोलपणा सांगितला आहे. यज्ञ, दान, तप, करू नका म्हणून सांगितले नाही. तुम्हाला करायचे असेल तर यज्ञ, दान व तप ही सात्त्विक या सदरात मोडणारी करा. त्यासाठी उत्तम साधनांचे प्रकारही सांगितले आहेत. पण करा काय? आणि किती करा? वाटेल तेवढे करा. पण त्याने होईल काय? काहीतरी केल्यासारखे नक्की होईल. तात्पर्यार्थ : त्यांचा उपयोग शून्य. जोंवर तुम्ही मला शरण येत नाही व तुमची साधने मला समर्पित होत नाहीत तोवर काय होईल?

**मग अश्वमेघ कोटी कीजे । रत्नें भरोनि पृथ्वी दीजे ।**
**एकांगुष्टींहि तपिजे । तप साहस्त्रीं ॥**

**जळाशयाचेनि नावें । समुद्रही कीजती नवे ।**
**हें असो आघवें । वृथाचि तें ॥**

सर्वांत श्रेष्ठ असे अश्वमेघ कोट्यवधी करा. त्याचप्रमाणे दान केवढे तर संपूर्ण रत्नजडित पृथ्वीचे दान करा. आणि फक्त एका आंगठ्यावर उभे राहून हजारों वर्षांपर्यंत पश्चर्या करा. तृषार्तांना पाणी मिळावे म्हणून गोड पाण्याचे समुद्रही निर्माण करा. पण परमार्थदृष्टीने याचा उपयोग विचारू नका. परमार्थांत याची किंमत शून्य आहे. मग कांहीच का घडणार नाही असे विचाराल तर ऐका:

सडकावरी वर्षलें । जैसें भस्मीं हवन केलें ।
कां खेंव दिधलें । साउलीये ।
नातरी चडकणा । गगन हाणीतलें अर्जुना ।
तैसा समारंभू सुणा । गेलाचि तो ।
धाणा गाळिते गुंडे । तेल ना पेंडी जोडे ।
तैसे दरिद्र तेवढें । ठेलेंचि आंगीं ।
गांठी बांधली खापरी । येथें अथवा पैलतीरीं ।
न सरोनि जैसी मारी । उपवासीं गा ।
तैसे कर्मजाते तेणें ते । नाहीं ऐहिकींचें भोगणें
तेथ परत्र तें कवणें । अपेक्षावें ॥ ४२१ ॥ ज्ञानेश्वरी, अ. १७

'खडकावर वृष्टि झाली. भस्मांत हवनीय द्रव्ये घातली, किंवा मोठ्या प्रेमानें सावलीला आलिंगन दिले, किंवा मोठ्या आवेशाने आकाशाला सपाटा लगावला. झाले काय? तर हात मात्र उखडला! तेल्याने घाण्यात दगड घातले तर तो काय तेल का पेंड मिळवील? गाळण्याचे कष्ट मात्र जरूर होतात. प्रवासात शिदोरी ऐवजी खापऱ्या बांधून घेतल्या तर उपाशी मारण्यालाच त्यांचा उपयोग. त्याचप्रमाणे या साधनांचे कर्मजात आहे. धड ऐहिकही नाही आणि पारमार्थिक तर नाहींच नाही.

कर्मनिष्ठेत हा काय दोष आहे? पुढील लेखांकात आपण याचा अधिक विचार करू.

# मराठीचे महाकवी-पूर्वार्ध

लेखक :- श्री. ठकार गुरुजी, पेठे विद्यालय.

माझा मऱ्हाठाचि बोल कवतुकें । परी अमृतातें हि पैजेंसी जींके ॥
ऐसी अक्षरेंचि रसिके । मेळवीन ।
मऱ्हाठियेया नगरीं । ब्रह्मविदेचा सुकाळु करीं । ज्ञा १२-१६,

या उदात्त हेतूने इ. स. १२९० मध्ये श्रीज्ञानदेवांनी 'गीतार्थ वाखाणिला.' ह. भ. परायण कै. पांगारकरांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्रावर अनेकांची साम्राज्ये आली गेली, पण महाराष्ट्रीयाच्या मनावरील ज्ञानेश्वरमाउलीचे साम्राज्य चिरस्थायी आहे ! गेली पावणेसातशे वर्षे महाराष्ट्र ज्ञानेश्वरीने केलेल्या अविरत आनंदाचा व ज्ञानाच्या वर्षावाचा उपभोग घेत आहे. हे ऋण महाराष्ट्रास मान्य आहे, म्हणूनच दरवर्षी कार्तिक वद्य त्रयोदशीस श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचा सोहळा व श्रीज्ञानदेवांचे पुण्यस्मरण महाराष्ट्रभर अत्यंत उत्कट भक्तिभावाने बहुसंख्य जनांकडून केले जात आहे. यंदाची श्रीज्ञानेश्वरांची पुण्यतिथी दिनांक १५ नोव्हेंबर, १९७१ रोजी येत आहे. त्या निमित्ताने श्रीज्ञानरायांस आपणातर्फे व आपल्या सर्व-महाराष्ट्रीय बंधूभगिनींतर्फे आदरांजली वाहून त्यांस वंदन करून त्यांचे यथाशक्ति व यथामति पुण्यस्मरण करण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे लेखकाने केला आहे.

**"म्हणौनि महाकाव्यां राॐ :"**

गीतार्थ ज्ञानेश्वरी ऊर्फ भावार्थदीपेकेतून महाराष्ट्राला समजावून सांगताना ज्ञानेश्वरांनी महाभारताचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

म्हणौनि महाकाव्यां राॐ । ग्रंथ गरूवतीचा ठाॐ ।
एथौनि रसा जाला आहो । रसाळपणाचा ॥ ज्ञा. १-३३

तेच वर्णन यथार्थपणे ज्ञानेश्वरीला लागू पडते. ज्ञानेश्वरी ही 'लावण्य रत्नभांडार। शारदेचें ॥' असून 'नानानवरसाब्धिपरिपूर्ण' असे महाकाव्य आहे. ती 'सौभाग्य पोखलें। सुखाचें येथें।' अशी आनंदमय आहे. 'भानुतेजें धवळिलें। जैसें त्रैलोक्य दिसे उजळलें!' अशी ती ज्ञानमार्गदर्शक तेजोदायिनी आहे. ती आम्हा मराठियांची पैतृव्य संपत्ति असून तिचा आम्हा मराठियांस अत्यंत अभिमान आहे. परंतु ती इतकी विशाल व गुणसमृद्ध आहे की तिचे यथार्थ वर्णन वा रसग्रहण करण्यास आम्ही 'अल्पमती मंद' जन असमर्थ आहोत.

गीतार्थ सांगताना आपण कठीण वेदांत सांगत आहो याची पूर्ण जाणीव

श्रीज्ञानरायांस होती. 'तैसे अध्यात्मशास्त्री इये । एक अंतरंगचि अधिकारिये ॥' ज्ञा. १८-१७२८, असे ते म्हणतात. परंतु त्याबरोबरच भावार्थदीपिका महाकाव्य व्हावी म्हणूनही त्यांस अत्यंत ओढ होती. हे जे सारस्वताचे झाड आपण लावीत आहोत ते

साहित्य सोनेयांचिया खाणी । उघडवी देशियाच्या अक्षोणी ॥ ज्ञा. १२-१९ अशी महत्वाकांक्षा त्यांनी बाळगली होती. 'अमृताचा कल्लोळ । कोवळा आणि रसाळ ॥' असे बोल त्या काव्यातून ते बोलले. आपले काव्य इतके रसाळ व गोड केले की ते ऐकताच 'श्रवणचि होती जिभा।' अशी स्थिती श्रोत्यांची होते.

महाकवी होण्यात हळुवार, कोमल व दयार्द्र अंतःकरण हवे असते. जगातील सौंदर्य हुडकून ते शब्दांनी साकार करण्याचे सामर्थ्यही लागते. श्रीज्ञानदेवांच्या ठिकाणी या दोन्ही गोष्टी पूर्णत्वाने होत्या. विदग्ध रसवृत्ती त्यांच्या नवनीतपूर्ण कोमल मनात अथांग भरलेली होती. त्यांचे मन त्यांच्या रसाळ शब्दांत 'आनंद समुद्रीं कुंभ। चुळबुळोनि भरलें ॥' आनंदाने बहरून आल्याने मधाच्या पोळचातून मध जसा थबथबून बाहेर पडतो तशी त्यांच्या मनात केवळ अद्भुतरम्याल्हादैकमयी स्वतंत्र दुजी सृष्टी निर्माण करणारी ज्ञानेश्वरी स्फुरण पावली.

**'अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादु चंद्रमा ।**
**करु मज पौर्णिमा । स्फूर्तीची जी ॥ ज्ञा. १४–२३.**

पौर्णिमेच्या चांदण्याप्रमाणे रुपेरी बरसात करणारे किंवा मेघाप्रमाणे आनंदाच्या श्रवणसरी झडविणारे,

**सुवायें मेघु सांवरे । जैसा चंद्रें सिंधु भरे ।**
**तैसा मातला रसु आदरें । श्रोतेयाचेनि ॥ ज्ञा. १३–११५०**

असे दिव्य महाकाव्य श्रीज्ञानदेवांनी आपणांस दिले.

हे काव्य पावणेसातशे वर्षांहून अधिक काळ आनंदाचा लोकांवर वर्षाव करूनही आपण मोगऱ्याच्या हाराप्रमाणे टवटवीत व ताजे राहिलेले आहे.

**पाहां पां मालतींचे कळे । घ्राणासि वाटले कीर परिमळें ।**
**परि वरिचली बरवा काई डोळे । श्रावली नोहोंति ॥ ज्ञा. ७–२०१**

असे महाकाव्य आपणांसाठी मागे ठेवून श्रीज्ञानरायांनी अवघ्या एकवीस वर्षांत आपले अवतारकार्य संपविले. दि. १५-८-१२७५ रोजी ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. दिनांक २६-१०-१२९६ रोजी त्यांनी समाधि घेतली. पण आपल्या अवघ्या एकवीस वर्षे व काही महिन्यांच्या आयुष्यात चिरंजीव स्वरूपाचे कार्य केले. आपले जीवन कृतार्थ केले व अनेकांना ते कृतार्थ कसे करावे याचा मार्ग दाखवून दिला.

**वोविया कीं होंति लेणें । साहित्यासि ॥ ज्ञा. १०–४१**

आपले 'सारस्वताचे झाड' व 'पदबंध नागर' काव्य 'रसभावी फुलैल' असे बहरून यावयाचे असल्यास त्याला तसेच सुंदर, गहरे मुलामय शब्द हवेत हे ज्ञानदेवांना माहीत होते. शब्दाला अर्थ, रूप, स्पर्श, गंध व नाद असतो हे जाणून त्यांनी आपण तयार करीत असलेल्या 'नादचित्रांच्या' रुपड्यांसाठी चोखंदळपणे अत्यंत मुलामय शब्द गोळा केले व नाजुक कलाकुसरतेने त्यांचा वापर आपल्या काव्यात केला. अनेक सुंदर संगमरवरी दगड एकत्र आणून रचून ताजमहाल बांधला गेला. एक काव्यच निर्माण झाले. पंडित जवाहरलालजी ताजमहालला ॲन एपिक इन स्टोन्स्– संगमरवरी दगडांनी साकार झालेले महाकाव्य असेच मानीत. तसेच ज्ञानेश्वरांनी सुंदर शब्द, समर्पक दृष्टांत व उपमा यांनी ओथंबिलेले महाकाव्य रचले. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे झाल्यास :

**म्हणौनि आखरीं सुभेदीं । उपमाश्लेष कोंदाकोंदी ।**
**झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी** ॥ ज्ञा. १३–११५७

**अथवा**

**'दाउं वेल्हाळे देशी नवी । जैसी साहित्यानें वोजावी ।**
**अमृता ही चुकी ठेवी । गोडिसेपणें** ॥ ज्ञा. १३–११५१

**तैसे देशियेचें लावण्य । हरौनि रसा आणि तेल तारुण्य ।**
**मग म्हणे पैल अगण्य । गीतातत्व** ॥ ज्ञा. १०-४७

**वा**

**देशियेचिनि नागरपणे । शांतु शृंगारातें जिणे ।**
**वोविया की होंति लेणें । साहित्यासी** ॥ ज्ञा. १०-४२

आपले मंत्रमुग्ध करणारे 'रसाळ' काव्य अमृतालाही कठीण म्हणवील,

**वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारु म्हणे ।**
**रस होती अ्ळगणें । अक्षरांचे** ॥ ज्ञा. १३–३

हे ज्ञानदेवांना कळून चुकले होते. अभिनववाग्विलासिनी, चातुर्यकलाकामिनी, विश्वमोहिनी शारदादेवी हिचा प्रसन्नमनाने दिलेला वरदहस्त आपल्यापाशी आहे, तिच्या प्रसाद-चंद्रम्याने स्फूर्तीची पौर्णिमा झाली असून काव्याची व आनंदाचीं प्रेमाची बरसात सर्वत्र होत आहे, आपल्या उन्मेषसागराला भरते येऊन रसवृत्तीची स्फूर्ति ओसंडत आहे, नवरसाचे सागर अथांग भरले असून त्यात इंद्रधनुष्याचे रम्य सौंदर्य आहे, 'नादीचें बीक मोडे' असे श्रवणसुभग शब्द आहेत, 'कां भूमीचे प्रमार्दव । सांगे कोंभाची लवलव ।' असे कोवळे मुलायम गहिरे शब्दबंध असून, 'नातरी कर्दळाचा गाभा । बुंधी सोडुनि उभा ॥' असे सुख देणारे रसाळ

शब्द आहेत की जे ऐकताच त्या शब्दानांच दृढ आलिंगन द्यावे असा मोह होतो व त्यातूनच आपण असे महाकाव्य घडवीत आहोंत कीं कैलास पर्वताला पाऱ्याचा रंग द्यावा, कर्पूरगौर शंकराला कापराची उटी लावावी, पौर्णिमेच्या चंद्राला चांदण्याने पांढरे करावे व चाफ्याच्या फुलाला चंदनाचा सुवास लावावा असे 'जिभे लागी स्नेहाळ आणि गोड' 'श्रोतियां होईल सुखडु, श्रवणसुखाचा।' 'दिसो परतत्त्व डोळां। रिधो महाबोध सकळां-। माजि विश्व।' असे ज्ञानपर अध्यात्मशास्त्र आपण सांगत आहोत, हे ज्ञानेश्वर जाणून होते, त्याजबरोबर मूळ आख्यानापासून वेदांतशास्त्रापासून विस्तार करीत असता काव्याच्या ओघाबरोबर आपण हिरवे गवताळ कुरण दृष्टीस पडलेल्या वासराप्रमाणे उडया मारीत दूर जात आहोत याचीही त्यांना जाणीव होती. तथापि आपण तमाम समाजाला 'वाक्चातुर्ये। सुखिया होईल।'' यासाठी झटत असून 'तैसी वाचा श्रोतिया ज्ञानाचि। दिवाळी' करीत आहोत असा त्यांचा आत्मविश्वास होता.

" तैसें ज्ञानाचें बोलणें। आणि येणें रसाळपणें।
आतां पुरे कोण म्हणे। आकर्णितां ॥ ज्ञा. १३–६४१

कितीही विस्तार केला तरी लोक आपणास:

'तंव श्रोते म्हणति राहे। कें परिहास ठाउ आहे।
भीसि कां वायां हें। कविपोषका ॥ ज्ञा. १३–५१

असे उत्तेजन देतील हेही त्यांस माहीत होते. ही आत्मप्रचीतीची जाणीव ज्ञानदेवांना बोलके करीत होती.

आपले महद्भाग्य असे की "पौर्णिमेच्या शारदीय चंद्राला पाझर फुटावा,

हों काज शारदियेचेनि उलें। चंद्रबिंब पाल्हैलें॥
कां तेज चि मूर्त बैठलें। आसनावरि ॥ ज्ञा. ६–२५

असे हे ज्ञानाचे अद्भूत रसायन,

तरि आतां चंद्रापासौनि निववितें। जे अमृताहूनि जिववितें।
तेणें अवधानें की जो वाढतें। मनोरथां माझेया॥ ज्ञा- ६-२४

हे महाकाव्य ज्ञानेश्वरमाउलीने आपल्याकरिता तयार केले.

काय वानू आता, न पुरे हो वाणी। मस्तक चरणीं, ठेवीतसें॥

असे तुकाराम महाराज म्हणतात तेच खरे!

## परतत्त्वस्पर्शः

शब्दनादाची रूपडी कितीही गोड असली तरी ती अक्षरवाङ्मयाचे शरीर असून त्यामधून जीवितमूल्य व शाश्वत जीवित तत्त्वज्ञान-ॲल्डो हक्स्लेच्या भाषेतील पेरेन्निअल फिलासफी– मानवजातीला दिली गेली पाहिजे, तरच ते चिरंतन वाङ्मय होते. प्रसिद्ध इंग्रज साहित्यशास्त्रज्ञ वॉल्टर पेटर आपल्या वाङ्मयाचे रसग्रहण ह्या ग्रंथात म्हणतो की शब्दाला रंग, रूप, गूढ सुगंध असला तरी वाङ्मयात मानवी जीविताची चिरंतन मूल्ये ( Something of the Soul of humanity ) प्रतीत झाली पाहिजेत हेच जीवित तत्त्वज्ञानाचे तत्त्व ज्ञानदेव पर-तत्त्व-स्पर्श मानतात. ते म्हणतात की काव्य कितीही रसाळ असले तरी त्यास पर-तत्त्व-स्पर्श नसेल तर ते काव्य निष्प्राण होईल.

**"वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ॥**
**रसिकत्वीं हि परतत्व । स्पर्श जैसा ॥** ज्ञा. १८-३४५

ज्ञानेश्वरीतील पर-तत्त्व-स्पर्श म्हणजे गीतार्थ, त्यातील ब्रह्मविद्या, अध्यात्मशास्त्र व आत्मसाक्षात्काराचा मार्ग. याची पुरेपुर जाणीव ठेवून ते अध्यात्मशास्त्र मराठी बोलांतून सर्वांना सुलभ करण्याचा हव्यास ज्ञानदेवांचा होता, त्यांची प्रतिज्ञा होती व ती त्यांनी पुरी केली. म्हणूनच

**तैसा वाग्विलासु विस्तारूं । गीतार्थां विश्व भरूं ॥**
**आनंदाचे आवारु । मांडू जगा ॥** ज्ञा. १३-१५४

म्हणून काव्य केले.

**तेणें आबाळसुबोधें । ओवियेचेनि बंधें ॥**
**ब्रह्मरसु स्वादे । आखरे गुंफिलीं ॥** ज्ञा. १८-१७२

ब्रह्मज्ञान सुलभ करणाऱ्या रसाळ ओव्या केल्या. संस्कृतातील अवघड तत्त्वज्ञान 'देशिये भाषेत' तयार केले.

**तैसें देशिचिया हवावा । इंद्रियें करितो राणिवा ॥**
**मग प्रमेयांचिया गांवा । लेसा जाईजो ॥** ज्ञा. ७-२०४

प्रमेयांच्या गावांत सरळ सुलभ सहजरीतीने जाता येईल असा त्यांचा विश्वास होता. आणि आपल्या या महाकाव्यात साहित्य आणि तत्त्वज्ञान एकत्रित दुथडी भरून वहात असून लावण्य आणि पातिव्रत्य असलेल्या मदालसेप्रमाणे आपले महाकाव्य चिरंतन तरुण व ताजे राहील याची त्यांना खात्री होती.

**जे साहित्य आणि शांती । हे रेखा दिसे बोलती ॥**
**जैसी लावण्य गुणवती । आणि पतिव्रता ॥** ज्ञा. ४-२१५

इतकेच समानत्व नव्हे तर वाचकांना आपण कमळाच्या पानावर चंद्र किरणांची मेजवानी देत आहोत ही टोचणी त्यांच्या मनाला वारंवार होती, व ती मेजवानी ब्रह्मज्ञानाच्या रसाची आहे किंवा ब्रह्मज्ञानासारखे अवघड तत्त्वज्ञान आपण मेजवानी-प्रमाणे गोड करीत आहोत हा अंतर्यामीचा दृढविश्वास त्यांना नव्या नव्या ओव्या निर्माण करण्यास प्रस्फुरित करीत होता.

**हें असो तेयां बोलाचीं ताटें भली । वरी कैवल्यरसें ओगरलीं ॥**
**हे प्रतिपत्ति मियां केलो । निष्कामासी** ॥ ज्ञा. ६-२२

आपली ही कैवल्यरसाची मेजवानी नितांतरम्य व गोड असून पाकसिद्धि उत्कृष्ट व्हावी, वाढणारणींही सुगरणी असाव्यात व जेवणारे ही चविष्ठ असावेत असे त्यांस वाटत होते.

**'येथ सुगरणी उदारें । रसज्ञे जेवण्हारे ॥**
**मिळती मग अवतरे । हातु जैसा ॥** ज्ञा. १३-११४४

अशा वेळेला त्या पंक्तीला जसा अमृताच्या रसरंगाची वहार येईल तशीच अवीट गोडी या आपल्या काव्यातून चिरंतन मधाच्या थेंबाप्रमाणे निथळत राहील अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.

**वाचकाची भूमिका :**

"जैसा सिंधू, चंद्रें भरें" अशी त्यांची प्रतिभा-सागराला भरती आल्यावर, 'मेघुं जैसा सावरे' अशा काव्य व तत्त्वज्ञानाच्या श्रावणसरी झडू लागल्या व 'वाचमर्थोऽनुधावति' या भवभूतीच्या उक्तीप्रमाणे

**" अर्थु बोलाचि वाट न पाहे । तेथ अभिप्राउ॰चि अभिप्रायातें विये ॥**
**भावाचा फुल्लौरा होतु जाये । मतीवरी** ॥ ज्ञा. ९-२७

असा त्यांच्या ओव्यांच्या माऱ्याखाली वाचक बिचारा गुदमरून जातो, पण ज्ञानदेवाचे अंतःकरण कवीचे नितांत हळुवार, 'कोंभाची लवलवे' त्यापेक्षाही मृदु, आणि म्हणूनच त्यांनी आपले काव्य वाचकांनी वाचावे, वाचकाची भूमिका कशी असावी या बद्दल जागोजाग मनोज्ञ व रसाळ विवरण केले आहे.

काव्याचे मर्म खरा कविहृदयी श्रोताच जाणतो. 'कविरेव हि जानाति । कवेः काव्यपरिश्रमम् ॥' हेच खरे. म्हणूनच कालिदासाने सुद्धा 'आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम.!' असे म्हटले आहे. 'रसज्ञहो काय तुम्हाविना मी' असे रे. टिळक म्हणतात, तर 'कुस्करूं नका हीं सुमनें' असे तांबे म्हणतात ते उगाच नव्हे ! चकोरपक्षाची पिले जशी चांदण्याचे कण पितात किंवा कमलाला

धक्का न लावता भ्रमर कमलाचा सुगंध लुटून नेतो तसे रसज्ञांनो तुम्ही माझे काव्य वाचावे असे ज्ञानेश्वर म्हणतात.

" जैसें शारदियेचि चंद्रकळें– । माझी अमृतकण कोवळे ।।
ते वेंचिति मनें मौआळें । चकोरतलगे ॥ ज्ञा. १-५६
जैसे भ्रमर परागु नेती । परी कमळदळे नेला नेणती ।
तैसी परि आहे सेविती । ग्रंथी इये ।। ज्ञा. १-५९
कां आपुला ठा ॐ न संडिता । आळंगिजे चंद्र प्रकटतां ।
हा अनुरागु भोगता । कुमुदिनी जाणे ॥ ज्ञा. १—६०

त्याप्रमाणे हळुवारपणे या काव्यांत प्रवेश केला पाहिजे.

तेयापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपणा चित्ता । आणूनियां ॥ ज्ञा. १—५७

मनोज्ञ रसवृत्ती धारण करून आपण हे काव्य वाचले म्हणजे ज्ञानेश्वरांना 'वक्तृत्वां अवधानाचा चारा' मिळेल व जर वाचक अरसिक असतील तर...

ए-हवीं कौंभैला उन्मेखु सुके । जरी उदास तुम्ही ॥ ज्ञा. अ. ९-२५
एवं कथिलेयादारभ्य । जें हें सर्वशास्त्रैकलभ्य ।
उपनिषदा सौरभ्य । दशदळांचे ।
हे जे ब्रह्माचेनि नवनीतें । व्यासप्रज्ञेचेनि हाते ।
मथुनि काढिलें आइतें । सार आम्ही । ॥ ५३८ ज्ञा. ७५

अशा प्रकारची वाचकांची तयारी करून, ज्ञानदेवांच्या अंतःकरणात पूर्ण फुललेल्या कमलाप्रमाणे 'गीतार्थाचा' 'सर्वशास्त्रांचा' व 'उपनिषदांचा' सौरभ्य भरभरून गेला, व तो मनात आवरून ठेवणे अशक्य झाल्याने–

जैसे कमळकळिका जालेपणें । हृदयीच्या मकरंदाने राखो नेणे ।
दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥ ज्ञा. १०-२७

असे आमोदाचे पारणे सर्वांना भरभरून देत असतानांच 'दोंदे फुटती अक्षरां। प्रमेयांची ॥' अशी तात्विक प्रमेये ज्ञानदेवांनी सहजसुलभ शब्दांत सांगितलीत, तीच ज्ञानदेवीचा गाभा आहेत.

———

# महात्माजींचे पुण्यस्मरण

दिनांक २ आक्टोबर, १९७१ रोजी सर्व राष्ट्रभर गांधीजयंती साजरी करण्यात आली. दिल्ली येथे राजघाटावर राष्ट्रपति डॉ. गिरी, उप-राष्ट्रपति पाठक व अनेक केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत राष्ट्रपित्यास भावपूर्ण आदरांजली वहाण्यात आली. त्यावेळी राष्ट्रपति डॉ. गिरी म्हणाले :

"या पुढे झगडयाचा नि हिंसेचा मार्ग स्वीकारायचा की गांधींचा मार्ग स्वीकारायचा हा प्रश्न आज मानवजाती पुढे उभा आहे.

गांधीजींच्या प्रदीर्घ जीवनांत अनेक वादग्रस्त मुद्दे निर्माण झाले असतील. तथापि त्यांनी आपल्या आयुष्यात नैतिक नि आध्यात्मिक मूल्यांना सदैव उचलून धरले. सामाजिक, आर्थिक, तसेच राजकीय प्रश्न सोडविताना ही मूलभूत तत्त्वे आपणास कधीहि विसरता येणार नाहीत, असे त्यांचे ठाम मत होते. धर्मनेच समाजाची धारणा होते. व्यक्तीची तसेच समाजाची प्रगति केवल धर्मच करू शकेल, अशी त्यांची श्रद्धा होती, प्राचीन वैदिक विचारपरंपरेचे गांधीजी म्हणजे मूर्तिमंत प्रतीकच होते.

राजकीय दृष्टचा त्यांनी भारतासाठी बहुमोल कार्य केले, हे तर खरेच पण त्यांनी नैतिक नि आध्यात्मिक क्षेत्रात जे कार्य केले ते त्याहूनही अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या पूर्व सरहद्दीवर जे भीषण प्रकार चालू आहेत ते पाहता गांधीच्या मार्गाचे महत्त्व विशेष पटते.

भगवद्‌गीतेच्या शिकवणुकीनुसार ते खरेखुरे 'कर्मयोगी' होते. त्यांनी ते तत्त्वज्ञान आचरणात आणले. त्यांचा धर्म अनैसर्गिक किंवा अतिमानवी नव्हता, तो करुणामय नि मानवतावादी होता. पण ते धर्माचे शत्रु होते, अशा वेडगळ समजुतीनें त्यांचा बळी घेण्यात आला."

डॉ. गिरी यांनी म्हटल्याप्रमाणे महात्माजींनी नैतिक व आध्यात्मिक क्षेत्रांत केलेले कार्य राजकीय क्षेत्रातील त्यांच्या कार्यापेक्षा अधिक मोलाचे व महत्त्वाचे होते. परंतु महात्माजींचे हे कार्य पुढे चालविण्यास आजचे सामाजिक व शासकीय कार्यकर्ते धडाडीने पुढे येत नाहीत, किंबहुना महात्माजींचे जीवनातील निरनिराळ्या गोष्टींचे मूल्यमापन चुकीचे होते, ते दुरुस्त करावयास हवे अशी धारणा सार्वत्रिक होत आहे हीच आजची शोकांतिका आहे... तथापि आजची आपली धारणा काहीही असली तरी महात्माजींनी केलेल्या कार्याबद्दल आपण सर्वांनी त्यांस आदरांजली वाहिली पाहिजे व त्यांनी दर्शविलेल्या व आचारलेल्या नीतिमूल्यांचा व तत्त्वांचा सखोल विचार करून मगच त्याबद्दलची आपली प्रतिक्रिया निश्चित करावयास पाहिजे.

आजच्या या राष्ट्रपित्याच्या १०२ व्या जयंतीच्या दिवशी आमचे व आमच्या सर्व वाचकांचे राष्ट्रपित्यास शतशः प्रमाण!

# हिमालयाची यात्रा

लेखक–ग. नी. पुरंदरे

( सप्टेंबरच्या अंकावरून पुढे चालू )

[ मे व जून १९६८ मध्ये लेखक, श्री. गणेश नीळकंठ पुरंदरे यांनी हृषीकेश, बदरीनाथ व हरिद्वारची यात्रा केली, त्याची हकीकत श्रीसाईलीलेच्या वाचकांस मनोरंजक वाटेल म्हणून त्यांनी आपल्या साध्या ओघवती भाषेत सांगितली आहे. श्री. पुरंदरे मुंबईतील प्रसिद्ध ॲडव्होकेट असून योगद 'सत्संग' सोसायटीचे ते सभासद व प्रमुख कार्यकर्ते आहेत.

सप्टेंबर १९७१ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या यात्रेच्या वर्णनात लेखकाने आपणांस ही यात्रा कशी घडली हे सांगितले आहे व हृषीकेशच्या यात्रेची व तेथील विठ्ठलाश्रमाची काही माहिंती दिलेली आहे. ती पुरी करून या अंकात लेखकाच्या हृषीकेशपासूनच्या पुढील प्रवासाची माहिती दिली आहे.

**–संपादक** ]

## हृषीकेश:

काही आश्रमवासी तेथे महिना दोन महिने राहणारे असे आहेत. कोणी म्हातारपणी विश्रांतीकरता येतात, किंवा कोणी साधनेसाठी येतात, तर कोणी एकांताकरिता किंवा अभ्यासाकरिता येतात. आश्रमाच्या पद्धतीने राहतात. आश्रमातील दैनिक कामकाजात हातभार लावतात. आश्रमात उतरण्याकरिता, रहाण्याकरिता, जेवणखाण, किंवा चहा वगैरे करिता तेथील चालक पैसे मागत नाहीत. पण उतरणाऱ्याने आपण समजून त्याबद्दल देणगीच्या स्वरूपात योग्य ते द्यावे असा शिरस्ता पडला आहे. आश्रमातील एकंदर वातावरण सलोख्याचे, शांततेचे, समाधानाचे, वानप्रस्थ किंवा थोड्या प्रमाणात संन्यस्त स्वरूपाचे आहे.

संध्याकाळी ( ता. २५ मे ) आम्ही विश्रांति घेतली. दुसऱ्या दिवशी ( ता. २६ मे ) बद्रीनारायणाची दोन तिकिटे काढावयास आश्रमाच्या व्यवस्थापकास सांगून आम्ही भागीरथी स्नानाला बाहेर पडलो. रस्त्यावर येऊन मुनि–की–रेतीपाशी कॉफी घेतली. पलिकडील तीरावर जाण्याकरिता नावेत बसलो. त्या नौका बाबा कालीवाल्याच्या आश्रमातर्फे ठेवलेल्या असतात. त्या अहोरात्र यात्रिकांची ने–आण एका तीरावरून दुसऱ्या तीरावर करीत असतात व त्याबद्दल काहीही घेत नाहीत. पैलतीरावर गेल्यावर प्रथम आम्ही भागीरथीचे स्नान उरकले. स्नान करावयास सुदर घाट आहेत. पाणी बर्फा-सारखे थंड, पण अतिशय स्वच्छ होते. अधून मधून लाकडाच्या तुळ्या किंवा ओंढे पात्राच्या वरती सोडून दिलेले वाहात वाहात आलेले दिसले. ते जागोजागीचे कंत्राटदार उचलून नेतात. येथे भागीरथीच्या पाण्याचा वर्ण निळसर हिरवा असा दिसतो. गढुळपणा बिलकूल नाही. प्रवाहातील दगड गुळगुळीत झालेले असतात. त्यांचा रंग शुभ्र, किंचित् गुलाबी असतो. हिमालयाचे मातीत लोह, मॅंगनीज वगैरे नसून ( कल्क ) कॅलशिअम भरपूर आहे, म्हणून ह्या नगश्रेष्ठातील शिलाखंड म्हणजे फरशीचे अनेक थर एकत्र झालेले प्रस्तर. स्नानानंतर प्रथम आम्ही गीताभवनांतील मंदिरे पाहिली. तेथील लक्ष्मीनारायण मंदिर फार प्रेक्षणीय आहे. गीताभवनाच्या एका बाजूस स्वर्गाश्रम असून दुसऱ्या बाजूस परमार्थनिकेतन आहे. हा सर्व आश्रम भव्य असून त्याची आवारेहि तितकीच विस्तृत आहेत. आवाराच्या मध्यभागी व काही ठिकाणी बाजूसही मंदिरे असून चारी बाजूंस यात्रिकांना उतरण्यासाठी खोल्या आहेत.

या खोल्या अगदी अल्प मूल्यावर वाटेल तितके दिवस यात्रिकांना, साधु–संन्याशांना मिळतात. प्रत्येक मंदिराच्या व्यवस्थापकाची कचेरी अगदी प्रवेशद्वाराजवळ असून कचेरीचा थाट अगदी भारतीय पद्धतीचा असतो. देशी गालिचाची बैठक, लोड, तक्के, लहानशी डेस्क्, भिंतीवर देवादिकांच्या राष्ट्रपुरुषांच्या तसबिरी. व्यवस्थापक बहुधा भगवी वस्त्रे परिधान करणारे संन्याशी महंत. पट्टेवाले कर्मचारी गणवेषात असतात. पाठीमागे कपाटांत अध्यात्म-विषयक ग्रंथ, पोथ्या, वगैरे. पुढे अन्नसत्र–सदावर्तासाठी पथिकांनी टाकलेले देणग्यांचे पैसे गोळा करणाऱ्या पेट्या. येथील मंदिरे विविध देवदेवतांची.

राम, हनुमान, कृष्ण, गीतोपदेशक सारथी कृष्ण, लक्ष्मीनारायण, काली, दुर्गा, सरस्वती, शारदा, शिव, शिव–पार्वती, देवी, यांची. ही सर्व मंदिरे अत्यंत सुशोभित केलेली आहेत. तसेच ज्या महंत–स्वामी पुरुषांची ही निकेतने स्मारके आहेत त्यांच्या संगमरवरी पुतळेवजा मूर्ती तेथे बसविलेल्या आहेत. मूर्तींच्या दोन्ही बाजूंस स्वच्छ बिलोरी आरसे लावलेले आहेत. म्हणजे पाहणारास मूर्तीच्या दोन्ही बाजूंस अगणित गुणित प्रतिमा दिसतात व अचंबा वाटतो. सगळीकडे कमालीची स्वच्छता, टापटीप, ठीकठाक व्यवस्था. धुळीचा कण, केरकचरा, कागदाचे तुकडे वगैरे काही सुद्धा दिसत नाहीत. मंदिराच्या निकेतनांच्या बाहेर मात्र मिठाईची, खाद्यपेयांची विविध दुकाने, आयुर्वेदिक औषधांची व धर्मग्रंथांची दुकाने आहेत. येथे आमच्या योगद सत्संग सोसायटीचे रांची आश्रमातील सभासद श्री. व श्रीमती पालकर भेटले. श्रीमती पालकर या अमेरिकन आहेत. पण त्यांचा वेष भारतीय पद्धतीचा होता. त्यांना परमार्थ निकेतनात सोयीची जागा मिळाली नव्हती व पुढे बदरीकेदारला जायचे होते. आम्ही नंतर भागीरथी ओलांडून परत मुनी–की–रेतीवर आलो. तेथे अँटीकॉलऱ्याचे इंजेक्शन घेतले व परत आश्रमात आलो.

दुसरे दिवशी (२७ मे रोजी) पहाटे ५ वाजता आम्ही हृषीकेश सोडले. हृषीकेश सोडताना ह्या पुण्यभूमीचे पौराणिक महत्त्व थोडक्यात सांगून पुढील यात्रावृत्ताकडे वळू. येथील मुख्य मंदिर भरताचे. टेहरीच्या राजांनी या मंदिरास कित्येक गावे अग्रहार दिलेली आहेत. भरताने येथे तपश्चर्या केल्ली होती. त्याच ठिकाणास मुनी–की–रेती आजही म्हणतात. तसेच शत्रुघ्नाने सुद्धा येथे तपाचरण केले होते. इंद्रजिताचा वध केल्यावर त्याच्या शापाने लक्ष्मणास क्षयरोग झाला, तेव्हा लक्ष्मणाने सुद्धा रोग निवारणार्थ तपाचरण केलेले होते. त्या ठिकाणास 'लक्ष्मण झूला' म्हणतात. एवंच भागीरथीचा हा भाग खरोखरीच तपश्चर्येची जागा आहे, तपोभूमि आहे. म्हणूनच आजही येथे स्वर्गाश्रम, गीताश्रम, परमार्थ निकेतन यांसारखे असंख्य आश्रम, धर्मशाळा, पर्णकुटी, श्रद्धाळू व धनवान भाविकांनी बांधल्या आहेत, व त्यांतून यात्रिक, विद्यार्थी, साधू, संन्याशी व बैरागी यांची उतरण्याची, राहण्याची व जेवण्याची सोय आहे.

**बद्रीनाथाच्या मार्गावरः**

हृषीकेश सोडल्यावर खरी उत्तराखंडाच्या किंवा उत्तरापथाच्या यात्रेस सुरुवात होते. हिमालयाची प्रचंड भिंत येथून सुरू होते. हिमालयाच्या कुशीतच आर्यसंस्कृतीचा जन्म व विकास झाला.

हा भाग पुराणांत उत्तराखंड किंवा केदारखंड म्हणून विश्रुत आहे. पद्म व स्कंद पुराणात या तपोभूमीचे माहात्म्य वर्णिलेले आहे. याच तपोभूमीत ऋषिमुनी, द्रष्टे, कवि, स्मृतिकार, दर्शनकार, निर्माण झाले. याच भूमीत वेदव्यास ऋषींनी महाभारत रचिले. आजही हिमालयातील यात्रा केल्याने साधारण प्रत्येक भारतीयास आपल्या जीवनाची यथार्थता व इतिकर्तव्यता झाल्यासारखे वाटेल. याच तपोभूमीत श्रीमत् आद्य शंकराचार्य यांनी आपली विश्वविख्यात प्रस्थानत्रयी लिहिली. आधुनिक महर्षि स्वामी रामतीर्थ व स्वामी विवेकानंद यांनीही या भूमीतूनच आपल्या कार्यास प्रेरणा घेतली. देवाधिदेव महादेव यांचे हे प्रिय वसतिस्थान. अनेक राजर्षि, महर्षि यांनी मनःशांतीसाठी, तपश्चर्येसाठी, निवांतवासासाठी, वानप्रस्थाश्रमासाठी, हिमालयातील गिरिकंदरांचा आसरा घेतला. साऱ्या भारताचा सांस्कृतिक इतिहास हिमालयाच्या नजरेखाली घडून आलेला आहे. या नगाधिराजाचा नुसता नामोच्चार सुद्धा पुण्यपावन असा आहे. कविकुलगुरु कालिदासाने म्हटलेलेच आहे:—

**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।**
**पूर्वापरौ तोयनिधीऽवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ॥**

आमच्या पुढील बसमधील प्रवासास सुरवात झाली. 'मुनी-की-रेती' सोडल्यावर 'लक्ष्मण-झूला' लागला. 'झूला' म्हणजे झुलता कच्चा पूल. प्रचंड दोरखंडावर फळ्या टाकून केलेला पूल. केव्हाही काढता येतो. येथवर पोहोचल्यावर सगळ्या बसेसचा ताफा एकत्रित झाला. सुमारे तीस एक बसेस असाव्यात. सगळ्या एकजुटीने जायच्या, थांबायच्या, पहिलीवर लाल झेंडा व शेवटलीवर हिरवा झेंडा. काफिला पुढे सरकला म्हणजे गेट पास झाले अशी खुणेची भाषा. रस्ता अरुंद. फक्त एकाच दिशेने गाड्या सरकायच्या. विरुद्ध बाजूने गाडी सरकायला फारच थोड्या ठिकाणी रस्ता रुंद असायचा. त्यांत मिलिटरी गाड्या आल्या की त्यांना प्रथम वाट करून द्यायची. तोंपर्यंत बसेसचा काफिला थांबून राहायचा. असो. आपल्याकडल्या भाषेत सांगावयाचे म्हणजे गाड्या आता घाट चढू लागल्या. पण हा घाट एवढा प्रचंड की चढायला

एकूण सोळा तास लागले. सारखा चढ. थेट बद्रीनाथाला पोहोचेपर्यंत. डोंगरा-पाठीमागून डोंगर सरकू लागले. डोंगरावरून कंगोऱ्यासारखा कापलेला रस्ता. एका बाजूला पहाड तर दुसऱ्या बाजूला खोल दरी. पहाडावर उंच देवदार वृक्षा-सारखी झाडे तर दरीतून कडेकपाऱ्यांतून खळखळ आवाज करीत वाहणारी भागीरथी. भागीरथीच्या प्रवाहाखालचे शिलाखंड, वाळू, पांढरी सफेत, त्यामुळे पाण्यात गढुळपणा अजिबात नाही, की कुठे शेवाळे माजलेले नाही. प्रवाहाचा रंग स्वच्छ निळसर, फेनयुक्त होता. प्रवाहात जिवंतपणा भासमान होतो व भागीरथी ही खरोखरी देवीसारखी या गिरिकंदरांतून खेळत वृक्षराजींमधून वागडत चालली आहे असे वाटते.

सकाळी दहा वाजता देवप्रयाग आले, आमचा काफिला थांबला. या ठिकाणी बसेसनी दोन तास विराम घेतला. पथिकांना प्रातर्विधि, स्नान, वगैरेस भरपूर वेळ मिळाला. रस्त्यावरच थाटलेल्या दुकानांतून जे काही मिळाले, त्याच्यावरच जेवणाचे काम भागविले. कपडे वगैरे वाळवून पथिक पुन्हा बसेसमध्ये आपापल्या जागी बसले. अलकनंदा व गंगाभागीरथी यांच्या रमणीय संगमावर देवप्रयाग वसले आहे. प्रयाग म्हणजे संगम. संगमावर विशाल मंदिरे आहेत. स्नानकुंडे आहेत. बसेस थांबतात तेथून पहाडावरून खाली उतरून संगमावरून पुलाने पलीकडील पहाडावर जावे लागते. तेथे देवप्रयाग वसलेले आहे. खाली भागीरथीचा प्रवाह जोरात आवाज करून दगडावर, खडकावर, आपटत आदळत वाहत असतो. प्रवा-हाचा जोर पाहून मन कंपायमान होते. विलक्षण आनंद होतो. अलकनंदा व भागीरथी या दोघींच्या पात्रावर झुलते पूल आहेत. अलकनंदेच्या किनाऱ्या-किनाऱ्याकडून केदारनाथ-बदरीनाथकडे रस्ता जातो, आणि दुसरा भागीर-थीच्या उजव्या कडेने गंगोत्री जम्नोत्रीकडे जातो. हिवाळ्यात बदरीकेदारची सारी वस्ती देवप्रयाग, रुद्रप्रयाग, ज्योतिर्मठ वगैरे ठिकाणी मुक्कामास राहते. बदरीनाथच्या वाटेवर अशीच आणखी चार प्रयागे आहेत. रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग, व विष्णुप्रयाग.

देवप्रयाग ज्या पर्वतावर वसलेले आहे, त्या पर्वताचे नाव गृध्राचल. हा गृध्र म्हणजे रामायणातील जटायू. जटायूने या पर्वतावर तप केले होते. देवप्रयागला श्राद्ध करण्याचे महत्व आहे. ते महत्त्व पद्मपुराणातील केदारखंडात

सांगितलेच आहे. येथे श्रीरामाचे एक प्राचीन मंदिर आहे. देवप्रयागात बहुतेक वस्ती पंड्यांची आहे. येथे अनेक संस्कृत पाठशाला आहेत. येथे ज्योतिषाचाही अभ्यास होतो. येथे एक नवीन कॉलेजही सुरू झालेले आहे.

देवप्रयागहून आमची बस १२ चे सुमारास सुटली, व पुढील रस्ता आक्रमण करू लागली. मार्गावरील पुढील गाव म्हणजे कीर्तिनगर. या ठिकाणी टीहरी जिल्हा संपून गढवाल जिल्हा सुरू होतो. कीर्तिनगरच्या पुढचे मोठे गाव श्रीनगर. हे श्रीनगर म्हणजे काश्मीरमधील श्रीनगर नव्हे. येथे कोठेही आमची बस थांबली नाही. रस्ता सारा घाटातला आहे. अलकनंदा खळखळ वाहात पुढे जाणारी. मधून मधून पायी प्रवास करणारे यात्रेकरू भेटत. गाड्यांचा काफिला आला की ते पहाडाच्या कडेकडेने चालू लागत. पाठीवर एक गाठोडे व हातांत काठी. बसच्या मार्गावर पुढचे गाव म्हणजे रुद्रप्रयाग. पण येथे आमची बस थांबली नाही. गावातून बस जाताना गाव मोठे वाटले, शहर वाटले. मोठमोठी मिठाईची दुकाने दिसत होती. धर्मशाळा, खाद्यपदार्थांची दुकाने, पंड्यांची वर्दळ इत्यादी गोष्टींमुळे ते गाव शहर वाटले.

रुद्रप्रयागाहून केदारनाथाला रस्ता फुटतो, व केदारनाथच्या गाड्या येथून त्या रस्त्याला लागतात. येथे मंदाकिनी व अलकनंदा यांचा संगम होतो. दोन्ही हिमालयकन्या एकमेकींना अगदी कडकडून भेटतात. दोघींचा प्रवाह जोराचा आहे. त्यामुळे हवेत, वातावरणात जणु गर्जणारा ध्वनी सतत कायमचा ऐकू येतो. जणु निसर्गाने रौद्ररूप धारण केले आहे. येथे रुद्रेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. येथे आमची बस सुमारे दोन वाजता आली. येथून पुढील वाटेवरील मोठे गाव म्हणजे कर्णप्रयाग होय. येथेही आमची बस थांबली नाही. कर्णप्रयाग, रुद्रप्रयागहून लहान आहे. येथून राणीखेतला रस्ता जातो. कर्णप्रयागला अलकनंदा आणि पिंजर यांचा संगम आहे. येथेही वरून येणाऱ्या गाड्यांचा काफिला भेटतो. आम्हांस मधून मधून मिलिटरी वाहतुकीचे ट्रक्स व जीपगाड्या भेटत असत. तसेच रस्ता साफसूफ करणारे, दुरुस्ती करणारे, मजूर, कामगार भेटत असत. या पुढील मोठे गाव नंदप्रयाग. नंदप्रयागाला कण्वऋषींचे तपाचरणाचे ठिकाण व आश्रम होता असे म्हणतात.

कण्वऋषी म्हणजे शकुंतलेचे लालन पालन करणारे पितृतुल्य महर्षी. यांच्याच आश्रमात शाकुंतलाचा पहिला अंक झाला.

नंदप्रयागानंतर पुढचे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे चमोली. येथे आमची बस अर्धा तास थांबली. विरुद्ध दिशेने येणारा काफिलाही येथेच थांबला. मिलिटरी ट्रक्सची वर्दळ वाढली. चमोली हे जिल्ह्याचे ठिकाण. सरकारी कचेऱ्या, शाळा, कॉलेजे, निरनिराळ्या विकास योजनांच्या कचेऱ्या, पेट्रोल-पंप, उपहार गृहे, दुकाने वगैरे रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस दिसू लागली. येथे अलकनंदेचे पात्र खोलातले नसून अगदी सपाट मैदानावर आहे, त्यामुळे वाळवंटही मोठे असून शहर वसायला, इमारती वगैरे बांधायला जागा पुष्कळ आहेत. चमोलीहून केदारकडे जाण्याकरिता रस्ता आहे. शहरात दिसून येणारी माणसे चांगली उमदी, गोरी, सशक्त लांब चेहऱ्याची काटक व मेहनती दिसून आली. त्यांना गढवाली म्हणतात. डोंगर, पर्वत चढण्यास व उतरण्यास ते नेहमीच तयार असतात. जेथे वाव मिळेल तेथे शेतीकरिता वावर करून पीक काढणारे असे हे लोक आहेत. चराऊ मैदाने जागोजागी असल्यामुळे गाई विपुल, दूधदुभते विपुल. हिंदी फौजेत गढवाली सैनिकांचा भरणा पुष्कळ आहे. नेपाळी गुरख्यांसारखे गढवाली सैनिक अगदी हिरिरीने लढणारे व विश्वासू असतात. चमोलीपासून नेपाळी लोक दिसू लागले. लांब तंग पॅन्ट, शर्टवर एक जाकीट व डोक्यावर टोपवजा टोपी. हे लोक बहुधा येथे मजुरी करतात. डोली वाहून नेणारे मजूर बहुधा हेच असतात. हे जिल्ह्याचे ठिकाण असल्यामुळे चमोलीला कारकून वगैरे पांढरपेशा वर्गही आढळून आला. पण सगळा कारभार हिंदीत व गढवाली बोलीतच चाले. इंग्रजी कोणालाही चांगले बोलता येत नाही. फक्त बोललेले समजते. आमचे हिंदी व्याकरणशुद्ध व नागरी असल्याने त्यांच्या बोलण्यापुढे उच्च वाटले, त्यामुळे त्यांना आमच्याबद्दल आदर वाटला. त्यांच्या दृष्टीने आम्ही सुशिक्षित ठरलो. पण आमच्यापेक्षा बोलण्यात आदब त्यांच्यांत जास्त. पथिकांना उपयुक्त माहिती देण्यात सगळेच तत्पर.

चमोलीहून आमची बस संध्याकाळी पाचचे सुमारास निघाली. आता येथून चढण सुरू झाली. डोंगरामागून डोंगर येऊ जाऊ लागले. डोंगरावरून

कंगोऱ्या सारखा रस्ता कापलेला आहे असे वाटते. कधी कधी डोंगर चढल्यावर सरळ दुसऱ्या बाजूने उतरावयाचा व मग अगदी खाली खळखळ वाहणाऱ्या अलकनंदेच्या शेजारून नवीन डोंगर चढावयास सुरुवात होत असे. ड्रायव्हर सफाईदार वळणे घेत. उतारूंना मात्र मधून मधून धाकधूक वाटायची. अशा रीतीने मार्ग कापीत आमची बस संध्याकाळी सातचे सुमारास पिप्पाल-कोटीला आली. सगळ्या बसेस पाठोपाठ आल्या. त्या लहानशा गावातले जीवन एकदम सुरू झाले. चेतना आली. सहज हजार एक यात्रेकरू त्या मुक्कामाला रात्रीच्या मुक्कामासाठी उतरले. कंडक्टर्सनी गाडया खाली केल्या व उदईक बरोबर पाच वाजता गाडीवर येण्यास फर्माविले. या ठिकाणी उतरल्याबरोबर ताबडतोब रात्रीच्या मुक्कामाची सोय करावी म्हणून अनेकांनी सांगितलेले होते. आम्ही हमालासच एखादी स्वतंत्र चांगली खोली असेल तिकडे आम्हांस ने म्हणून सांगितले. त्याने एके ठिकाणी नेले. खोलीचे भाडे रु. ३. ८' × ८' ची लहानशी, एका बाजूला फळ्यांची भिंत केलेली पण स्वतंत्र खोली मिळाली. आत स्वतंत्र विजेचा दिवा होता. पाण्याचा खुजा आणून ठेवलेला. पुष्कळ यात्रेकरूंना स्वतंत्र जागा न मिळाल्याने, उघड्यावर, गच्ची-वर पडून रहावे लागले. कारण पिप्पलकोटी हे गाव अगदीच लहान आहे. फक्त बदरीनाथाचे यात्रेकरू रात्रीच्या मुक्कामाला येथे उतरणारे म्हणून थोडीशी वस्ती आहे. आम्ही खालून जेवणाची ताटे मागविली; पुरी, भाजी, डाळ भात अशी थाळी वरती आली. भाजी व डाळ यथातथाच होती, पण पुरी व भाजी बऱ्यापैकी होती. खाणे झाल्यानंतर स्वस्थपणे झोपलो.

[ अपूर्ण ]

# उचलली जीभ

**लेखक–डॉ. गो. रा. परांजपे**

परवा माझा एक जुना मित्र बरेच दिवसांनी माझ्याकडे आला. दिवाळीचा सीझन. त्यामुळे गाडीत अलोट गर्दी होती. घरी आला तो अगदी वैतागून! आल्या आल्या त्याने आपल्या प्रवासातल्या हालांचं वर्णन मला ऐकवायला सुरवात केली. "कायरे बाबा ती प्रवासातली खेचा-खेची. जेम-तेम कसाबसा एका डब्यात घुसलो. एका बाकड्यावर चारच माणसं बसलेली होती. जरा सरकून घेतलं असतं त्यांनी तर मला कॉर्नरला बसण्यापुरती जागा निश्चित झाली असती. पण डब्यात 'आपला' एक माणुस असेल तर शपथ. सगळी यंडू गूंडू, निर्वासित, आणि पावणे कंपनी भरलेली होती. सबंध प्रवास उभ्याने करावा लागला. पाय नुसते भरून आलेयत!" मी त्याला म्हणालो, "हे बघ! तू कोठेही गेलास तरी, ही तुझी वृत्ती जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत तुला प्रवासात काय किंवा कोठेही काय असाच त्रास होणार. तुला मद्रासी, सिंधी, मराठामोळे हे लोक परके वाटतात आणि गाडीत आपले कोणी नव्हते म्हणून तू तक्रार करतोस. ते तुझे कोणीच लागत नाहीत कां? तू गेल्याबरोबर जागेसाठी अरेरावीने अकांडतांडव सुरू केलं असशील. मग कशी द्यावी त्यांनी तुला जागा? जरा प्रेमळ शब्दांत समजुतीने त्यांना आपले असं मानून बोलला असतात तर नसती दिली त्यांनी तुला जागा?"

मित्राजवळ झालेल्या या संभाषणामुळे मी विचार करू लागलो. शब्द! विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी मानवाला निसर्गाकडून मिळालेलं एक अमोल वरदान. इतर कोणाही सजीव प्राण्याजवळ नाही असं हे अमोल रत्न मानवाला प्राप्त झालं आहे. पण त्या हिऱ्याला कोंदणात बसवण्याऐवजी त्याचं चूर्ण करून मानव त्याचा विषासारखा उपयोग करू लागला. आता माझ्या मित्राचेच पहा. यंडू गुंडू म्हणून परप्रांतीतयांची हेटाळणी करण्यात सिंधी लोकांना निर्वासित म्हणून हिणवण्यात त्याला काय फायदा झाला? उद्या याच्यावरच दुर्दैवाने निर्वासित व्हायची पाळी आली तर? जसा तो तसेच तेही सारे, एकाच भारताचे घटक, हिंदभूचे पुत्र.

पण नाही. कुंपण तोडून थोडा व्यापक विचार करायला कोणी तयार नाही. "अरे तो मुसलमान आहे, सांभाळून रहा." सहज कोणीतरी मोठ्या उपदेशकाच्या थाटात बोलून जातो. जणू काही मुसलमान म्हटला की इथून-तिथून

तो देशद्रोही. त्याचा आपला संबंध काय तो फक्त शत्रुत्वाचा. तो इथल्या संस्कृतीशी राष्ट्रनिष्ठेशी एकरूप होण्याचा प्रयत्न करीत असला तरी आपण त्याच्याकडे निराळ्या वृत्तीने पाहून फुटीरपणाला अधिक प्रोत्साहन मात्र देत असतो. मला गमतीने मुसलमान .या शब्दाची व्युत्पत्ति एकदा अशी सुचली. मूळ समान ते मुसलमान. त्यांचं आणि आपलं मूळ समानच आहे. एकाच राष्ट्राचे एकाच मानवतेचे ते व आपण घटक आहोत, याच द्योतकच जणू त्यांच्या नावात साठवलेलं आहे. गेल्या गणेशोत्सवात कोकणातल्या कित्येक गांवांतून गणेशविसर्जनाच्या मिरवणुकींत लेझीम खेळण्यापासून ढोल-ताशे वाजवण्यापर्यंत असंख्य मुसलमानांनी उत्साहाने हिरीरीने भाग घेतला. त्यांना या गोष्टी कोण शिकवायला गेला होता ? आपोआपच ते आपल्या संस्कृतीशी राष्ट्राशी एकरूप व्हायला लागले आहेत. आपण त्यांच्या या वागण्याचं कौतुक केलं पाहिजे, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

पण त्यासाठी मनाचा आणि जिभेचा समतोलपणा असायला हवा ना ? तो बरेच वेळा नसतो म्हणून तर आपण म्हणतो उचलली जीभ नि लावली टाळ्याला ! सहज बोलण्यात सुद्धा दुसऱ्याचा मर्माघात होईल, त्याला झोंबेल खुपेल असं बोलताना आपण पर्वा करीत नाही. त्याच्या अंतःकरणावर त्याची काय प्रतिक्रिया होईल आपल्याला दुसरा बोललेला जसं झोबतं तसंच त्याला होणार नाही का हा साधा विचार सुद्धा आपणाला शिवू शकत नाही. मग अरे म्हटल्यावर कारे म्हणून उत्तर येणारच. 'कां हो' म्हणून प्रतिसाद यायला हवा असेल तर आपणही 'अहो' म्हटलं पाहिजे.

हरिजन ! महात्माजींनी हा शब्द प्रथम रूढ केला. त्यांना काय आपल्या सारखं महार म्हारडचा म्हणता आलं नसतं ? पण हरिजन हे नाव त्यांना देण्यात महात्माजींच्या अंतःकरणात त्यांचेविषयी केवढी सहानुभूति, 'आपलेपणा' 'कळवळा' साठवलेला होता हे दिसून आले. सर्व लोक परमेश्वराचे. परंतु पददलित अशिक्षित समाजाने परंपराप्रियतेमुळे हीन ठरवलेले म्हणून ते हरीला, परमेश्वराला अधिक जवळचे. म्हणून ते 'हरिजन.' पण अजूनही कित्येकांना त्याना हरिजन म्हणायचं जसं काही जिवावर येतं. त्यांना म्हार म्हटलं की यांना समाधान होतं. अरे पण कां ? तो धर्मात्मा धर्मराज तर दुष्टपणाच्या मूर्तिमंत पुतळ्याला त्या दुर्योधनाला सुद्धां सुयोधन म्हणून हाक मारीत असे.

शब्द उच्चारता येतात म्हणून आपला त्यांचा वाटेल तसा वापर करायचा याला काही सुसंस्कृतता म्हणत नाहीत. गाडीत पहा, मोटरीत पहा. जागेवरून शब्दाला शब्द वाढून वादावादी आणि मारामारी पर्यंत मजल पोहोचलेली अनेक वेळा आपणाला दिसून येते. कारण बघायला गेलं तर ते इतकं क्षुल्लक असते की मागाहून त्या भांडण करणाऱ्याला सुद्धा आपण एवढ्याशा कारणासाठी उगीचच कां भांडलो म्हणून हंसू येते. पण त्या वेळी जणू काही त्याच्या अंगात भूतसंचार झालेला असतो.

मनुष्य संतापला भावनावश झाला म्हणजे शब्दांवर त्याचा ताबा रहात नाही. आपण काय बोलतो याच त्याला भान ही नसतं. त्याच्या शरीराचा एखाद्या अज्ञात शक्तीने ताबा घेतल्यागत तो काहीच्या काही दुसऱ्याला झोंबेल, बोचेल असं बोलून जातो. सुसंस्कृत असला तर त्याच्या शब्दांचे बाह्य स्वरूप वेगळं असेल. एखादया गरिबाला तो 'या श्रीमंत' म्हणून हिणवील, आणि एखादा अ-संस्कृत असला तर त्याचे शब्द शिवराळ असतील. त्या गरिबाला तो ए भिकारड्या म्हणून हाक मारील. ज्याच्या बाबतीत हे शब्द उच्चारलेले असतील त्याच्या मनावर ते खोलवर परिणाम करून दिल्याशिवाय रहाणार नाहीत. कदाचित त्यामुळे परस्परांमध्ये कायमच वैमनस्य निर्माण करायलाही ते कारणीभूत ठरतील. आणि त्याचं स्वतःचंच नव्हे तर त्याच्या आप्त स्वकीयांचंही त्याच्याबरोबर नुकसान केल्याशिवाय रहाणार नाहीत.

भारतात आता विविधभाषा बोलणारे लोक रहातात. कानडी, मल्याळी, तेलगु, उर्दु, मराठी, बंगाली, हिंदी, पंजाबी. आणखी कितीतरी. या भाषांचें शब्द उच्चार वेगळे असतील पण सर्वांचा आशय एकच असतो. निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्यांनी एकमेकांमध्ये समंजसपणा दाखवला, एका प्रांतातल्या, गावातल्या, कुटुंबातल्या माणसांनी एकमेकांशी चांगुलपणाचे संबंध ठेवले, बोलतांना चांगले शब्द वापरले तर अकारण वाढणारी कटुता किती तरी प्रमाणात कमी होईल.

"फुकाचे मुखीं बोलता काय वेंचे" म्हणून समर्थ रामदास स्वामींनी सर्वांना सवाल केला आहे. गोड बोलण्यामुळे उदार आणि व्यापक विचारामुळे सहज घडून येणाऱ्या गोष्टी केवळ आपण कठोर शब्दांमुळे आणि संकुचित वृत्तीमुळे अवघड करून ठेवतो. बरेच वेळा आपण आपल्या जातीच्या, प्रांताच्या अहंकाराला फाजील महत्त्व देऊन बोलत असतो, व्यवहार करीत असतो. फार कशाला, पुणें आणि मुंबई ! इतकी जवळ जवळची दोन शहरं. पण पुणेकर मुंबईकरांना नावं ठेवीत असतात आणि मुंबईकर पुणेकरांना ! बघायला गेलं तर त्यांत तथ्य काहीसुद्धा नसतं. पण उगीचच आपला शब्दच्छल चालू असतो. एकच विचार किंवा भावना पण ती व्यक्त करतांना वापरायच्या शब्दांत फरक पडल्याबरोबर किती वेगवेगळा परिणाम करून जाते, याच्याबद्दल एक गमतीची गोष्ट मला आठवते.

एका ऋषीजवळ काही शिष्य विद्याभ्यास करीत होते. एकदा त्या ऋषीने त्यांतल्या दोन भिन्न प्रवृत्तींच्या पण हुषार अशा विद्यार्थ्यांची परीक्षा बघायचं ठरवलं. त्याच्या आश्रमाच्या समोरच एक वाळलेला वठलेला वृक्ष उभा होता. त्यानें दोघांनाही एका वाक्यात त्याचं वर्णन करायला सांगितलं. त्यांतला एक जो अगदी रूक्ष प्रवृत्तीचा विद्यार्थी होता त्याने वर्णन केले : "शुष्कं काष्ठं तिष्ठति अग्रे ! "

आणि दुसऱ्यानें तेंच वर्णन किती सुंदर शब्दांत केलं. पहा :

"नीरसतरुवरत्रिलसति पुरत : ! ! "

दोघांच्याही सांगण्याचा आशय एकच. पण एकाने त्यांत सौंदर्य, काव्य, निर्माण केले. तर दुसऱ्याने त्यात अगदी रूक्षता निर्माण केली.

समाजामध्ये वागताना, बोलताना आपण बोलतो, वागतो त्याची इतरांवर काय प्रतिक्रिया होईल, परस्परांमध्ये वैमनस्य, तेढ ही वाढीला न लागता सर्वांमध्ये एकोपा, सलोखा कसा निर्माण होईल याचा विचार प्रत्येकाने निरंतर करायला हवा. आपल्या वागण्या बोलण्याने आपले आणि पर्यायाने आपल्या राष्ट्राचेही अनहित तर होणार नाही ना, त्याची प्रतिभा अधिक उज्ज्वल होण्याऐवजी त्याला कमीपणा तर येणार नाही ना याचा प्रत्येकानें विचार करायला हवा. बरेच वेळा आपणाकडे परदेशी प्रवासी पाहुणे, व्यापार वगैरे अन्य कामांनिमित्त येत असतात. त्यांच्यांशी व्यवहार करताना सुद्धा आपल्या संस्कृतीची राष्ट्रप्रेमाची त्यांच्यावर छाप पडेल अशीच आपली वर्तणूक असायला हवी. आणि यासाठी आपल्या विचारांतला आणि बोलण्यातला संकुचितपणा काढून टाकून त्याला विशाल राष्ट्रव्यापी दृष्टिकोण द्यावयाला हवा. संकुचितपणाची वृत्ती ही एखाद्या सांचीव पाण्याच्या डबक्या-सारखी आहे. तर व्यापकपणा हा विशाल महासागरासारखा आहे. आपण डबक्यात रहाणाऱ्या कूपमंडूकाची वृत्ती सोडून देऊन देवमाशासारखा विचारांच्या आणि बोलण्याच्या महासागरांत व्यापक विहार करायला हवा. वृत्ती आत्मकेंद्रित करण्या-ऐवजी राष्ट्राभिमुख करायला हवी. सारे भारतीय म्हणुन परस्परांमध्ये दिलजमाई व्हायला हवी !

**जय भारत.**

---

## साईलीलेचे आश्रयदाते

श्री. रा. रा. हरिकिशन राजदान यांनी एक हजार एक रुपये मासिकाच्या कायमनिधीत भरून मासिकाचे कायमचे आश्रयदायित्व स्वीकारले आहे. तसेच खालील सद्‌गृहस्थ प्रत्येकी रुपये दीडशे मासिकाच्या कायमनिधीत ठेवून मासिकाचे कायमचे वर्गणीदार झाले आहेत.

(१) डॉ. एच्. ए. बाटलीवाला
(२) श्री. रा. रा. ए. सी. देशपांडे
(३) डॉ. जी. सी. जैन
(४) श्री रा. रा. बी. वाय्. प्रधान
(५) श्री रा. रा. प्रेमानंद शिवराम राव
(६) श्री रा. रा. योगेंद्र श्रॉफ्
(७) श्री रा. रा. जे. डी. शहाडे
(८) श्री रा. रा. ए. सी. त्रिखा
(९) श्री रा. रा. सूर्यनारायण वेदुला
(१०) के. के. कुमार आणि कंपनी
(११) ले. क. मु. ब. निंबाळकर (नि.)
(१२) श्री. रा. रा. आर्. बी. डुमणे

वरील सर्व आश्रयदात्यांच्या आश्रयाबद्दल श्री. साईलीलेचे चालक कृतज्ञ आहेत. अपेक्षा आहे की श्रीसाईलीलेच्या अशा आश्रयदात्यांत वेळोवेळी भर पडून श्रीसाईलीलेचे कायमचे आधार वाढतील व श्रीसाईलीलेस आपल्या वाचकाची सेवा अधिक उत्साहाने व जोमाने करता येईल.

------

# ग्रंथपरिचय

## श्रीसाईमहिमा

रचणार—श्रीसाईसेवक **बी. नारायण**
प्रकाशक—**श्रीभगवती संस्थान** कुर्ला

श्रीसाईबाबांच्या त्रेपन्नाव्या पुण्यतिथीच्या दिवशी श्रीभगवती साईसंस्थान कुर्ला यांनी साईसेवक श्री. बी. नारायण यांनी रचलेले 'साईमहिमा' प्रसिद्ध करून सर्व साईभक्तांस सादर अर्पण केले आहे. महिमा छोटासा असला तरी त्यात श्रीसाईबाबांच्या चरित्रातील सर्व महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख आलेला असून श्रीसाईबाबांच्या परमात्मस्वरूपाचे वर्णन आहे. महिम्यासोबतच श्रीसाईभक्त करीत असलेली भजने, शिरडी येथे म्हटल्या जाणाऱ्या भूपाळ्या, आरत्या, प्रार्थना, शेजारती दिल्या आहेत. महिमा सांघिक पारायणास फार सुलभ आहे. अशा तऱ्हेचा महिमा रचल्याबद्दल श्रीसाईसेवकांचे अभिनंदन व ती श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीच्या दिवशी प्रसिद्ध केल्याबद्दल श्रीभगवती साईसंस्थान यांस धन्यवाद !

------

## पुण्यतिथी उत्सव, १९७१

यंदाच्या श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीचा उत्सव दिनांक २९ सप्टेंबर ते १-१०-७१ अखेर शिरडीस श्रीसाईसमाधिमंदिरात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. उत्सवास निरनिराळ्या भागांतून लोक आले होते. दिनांक २९ बुधवार रोजीं पहांटे पांच वाजता श्रीसाईबाबांच्या फोटोची व श्रीसाईसच्चरिताची मिरवणूक मंदिरांतून निघून गुरुपादमार्गे द्वारकामाईत आली. भव्य चांदीच्या सिंहासनावर फोटोची स्थापना करण्यात आली, व मग साईचरित्राचे पारायणास आरंभ झाला.

दुपारी ३॥ ते ५ श्री. पांडुरंग शास्त्री गोसावी, पुणें यांचे प्रवचन झाले. सीमोल्लंघनाची मिरवणूक पाच वाजता श्रींच्या मंदिरातून निघून खंडोबाचे देवळाजवळ ६। वाजता आली व तेथे सीमोल्लंघनाचा कार्यक्रम झाला. धूपारती झाल्यावर श्रीकृष्ण बँड पथक, भोईवाडा, मुंबई यांच्या बँडवादनाचा कार्यक्रम झाला. रात्री श्रींच्या पालखीची मिरवणूक बँड, चौघडा व इतर वाद्ये यांचे गजरांत गांवातून मिरवून आल्यावर नित्याची शेजारती झाली. तसेच रात्रीं ९। ते १२॥ श्री. रुस्तुमकाका—रेडिओ स्टार ( अहमदनगर ) यांचे गायन झाले.

तिथीप्रमाणे श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीचा दिवस गुरुवार दिनांक ३० सप्टेंबर १९७१ होता. पहाटे पासूनच श्रींच्या दर्शनासाठीं भक्तांची गर्दी होती. पहाटे फोटोची व ग्रंथपारायणसमाप्तीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुपादुकामार्गें मंदिरात आली. नंतर श्रींचे मंगल स्नान वगैरे कार्यक्रम झाल्यावर भक्तांच्या सामुदायिक अभिषेककार्यक्रमास सुरुवात झाली. सकाळी ९ ते ११-३० पर्यंत भिक्षा झोळीचा कार्यक्रम झाला व श्रींच्या वस्त्रांची प्रसादरूपानें लिलावाने विक्री करण्यात आली. ११ ते १२ श्रीयुत श्रीपाद बाळकृष्ण देव, ठाणे यांचे पुण्यतिथि आख्यानाचे कीर्तन झाले. दुपारी मध्यान्ह आरती झाल्यावर ४ ते ५—३० साकोरीच्या मठातील कन्याकुमारीचे भजन झाले. रात्रौ श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक निघाली.

रात्रीं ९ ते १ श्री. अभिषेकी, रेडिओ स्टार यांचे गायन झाले. रात्रीं कलाकारांनी श्रींपुढे हजेऱ्या दिल्या. मंदिर रात्रभर भक्तांचे दर्शनासाठी उघडे होते.

दिनांक १-१०-१९७१ रोजी कपडाविक्री, अभिषेक, पूजाअर्चा झाल्यावर ११ ते १२-१५ संस्थान गवई, श्री. ग. वि. जोशी, काव्यतीर्थ शास्त्री यांचे गोपालकाला कीर्तन झाले. त्यानंतर मध्यान्ह आरती झाली, व सर्व भक्तांना तीर्थप्रसाद देण्यात आला. दुपारीं ४॥ ते ५॥ श्री. पांडुरंग शास्त्री गोसावी यांचे प्रवचन झाले व उत्सवाची सांगता झाली.

# श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी,
## वार्षिक अहवाल–१९७०.

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीच्या कारभाराचा इ. स. १९७० च्या वर्षाचा अहवाल श्रीसाईबाबांचे भक्त व संस्थानचे हितचिंतक यांस सादर करण्यात आम्हांस आनंद वाटत आहे.

अहवालच्या सबंध वर्षात संस्थानचा कारभार कोर्ट नियुक्त रिसीव्हर यांचे कडेच होता. दिनांक १-५-१९६७ पासूनचे संस्थानचे रीसीव्हर श्री. दत्तात्रय दिनकर पाटणकर हे वर्षाच्या सुरुवातीपासून रिसीव्हर म्हणून काम करीत होते. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्यांना हे काम दिनांक १५-८-१९७१ पासून सोडावे लागले. संस्थानच्या दुर्दैवाने ते दिनांक ९ जानेवारी ७१ रोजी श्रीसाईचरणी विलीन झाले. श्री. पाटणकर यांनी साडेतीन वर्षांच्यां कारकीर्दीत संस्थानच्या कारभारांत अनेक सुधारणा केल्या. त्यांचे उल्लेख वेळोवेळीच्या अहवालांत आलेले आहेत. संस्थानच्या कारभाराशी ते तादात्म्य पावले होते व साईभक्तांच्या सेवेत ते सदा रत असत. त्यांच्या निर्याणाने संस्थानची महान् हानि झाली आहे. श्रीसाईनाथांची इच्छा !

दिनांक ११ आक्टोबर, १९७० पासून कोर्ट-नियुक्त रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांनी रीसीव्हरच्या कामाची सूत्रे आपल्या हाती घेतली व तेव्हांपासून आजतागायत संस्थानचा कारभार ते अत्यंत उत्साहने व जोमाने चालवीत आहेत.

अहवालच्या वर्षात संस्थानच्या जिंदगीची किंमत रु. : ५८, ९३,२४९ ; ६८ पासून रु. ६५,२७,६०१ : ६२ इतकी वाढली.

संस्थानचे आर्थिक व्यवहारांचे हिंशोब मेसर्स पी. जी. भागवत अँड कंपनी यांच्याकडून तपासून घेतलेले आहे. त्यांचा सारांश सोबत जोडलेल्या

(१) ताळेबंद,

(२) आय व्यय तक्ता व

(३) निरनिराळया निधीत गुंतवलेल्या रकमा दर्शविणारा तक्ता यात आलेला आहे.

वर्षात संस्थानची : (१) आर्थिक दृष्ट्या प्रगति झाली.

(२) भक्तांची आवक-जावक वाढत असून निवासस्थानांपासून होणारे उत्पन्न वाढले ;

(३) अभिषेक व श्रीसत्यनारायण-पूजा करणाऱ्या भक्तांची संख्या वाढली.

(४) गरीबांना अन्नदान करण्यासाठी, शिक्षणकार्यासाठी, शिर्डी येथील हॉस्पिटलवर होणारा खर्च वाढला व या कार्याचा लाभ गरजू जनतेस अधिक मिळाला.

अहवालाच्या वर्षात श्री. जे. आर्. कॉन्ट्रॅक्टर यांच्या दातृत्वाने सुरू झालेल्या मंगल कार्यालयाच्या बांधकामात बरीच प्रगती झाली, तसेच गेल्या वर्षी सुरू झालेल्या कर्मचारी निवासाचे बांधकाम ही बरेच प्रगत झाले. संस्थानच्या हद्दीतील रस्ते सिमेंट कॉंक्रीटचें करणे व मोकळ्या जागा स्वच्छ राहतील अशी व्यवस्था राखावी या बद्दल योजना आखल्या गेल्या व त्यांच्या कामांस सुरुवात झाली, तसेच सरंजामी बागेत २५ फूट उंचीवर सिमेंट कॉंक्रीटचा पाण्याचा हौद बांधून शिर्डीस येणाऱ्या भक्तजनांना व यात्रेकरूंना पाण्याचा भरपूर पुरवठा करता येईल अशी योजना आखून तिच्या कार्यास सुरुवात झाली.

श्रीसाईलीला मासिक नियमितपणे वर्षभर प्रसिद्ध करण्यात आले. या कामी श्री. पु. बा. कुलकर्णी यांचे संस्थानला वर्षभर सतत साहाय्य होते.

संस्थानचे कार्यक्षेत्र दिवसें दिवस विस्तृत होत आहे व संस्थानचे कार्याचे यश हे साईभक्त, संस्थानचे हितचिंतक, व संस्थानचे कर्मचारी यांनी मनःपूर्वक केलेल्या सहकार्याचे दृश्य फळ आहे. अहवालाच्या वर्षात संस्थानचे कार्यास श्रीसाईभक्त, संस्थानचे कर्मचारी व संस्थानचे हितचिंतक यांनी जो हातभार लावला त्याबद्दल त्या सर्वांचे संस्थानचे चालक आभारी आहेत.

शिर्डी, श्रीसाईबाबा
पुण्यतिथी दिनांक
१०-९-१९७१

**का. सी. पाठक**
रिसीव्हर, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

## SHRI SAI BABA
## BALANCE SHEET

| LIABILITIES | Rs. P. | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|---|
| **Trust Corpus :** | | | |
| Balance as per last B/S .. | 29,03,594.37 | | |
| *Add :* Interest .. | 70,453.94 | | |
| Donations during the year .. | 45,759.96 | 30,19,808.27 | |
| *Less :* Establishment expenses | | 70,453.94 | 29,49,354.33 |
| **Permanent Fund :** | | | |
| Balance as per last B/S .. | | 4,19,760.86 | |
| *Add :* Donations during the year .. | | 25,176.50 | |
| Interest earned .. | | 17,690.00 | 4,62,627.36 |
| **Building Fund :** | | | |
| Balance as per last B/S .. | 3,12,496.16 | | |
| *Add :* Donations during the year .. | 8,136.25 | | |
| Interest earned .. | 14,370.01 | 3,35,002.42 | |
| *Less :* Maintenance expenses .. | | 14,370.01 | 3,20,632.41 |
| **Medical Fund :** | | | |
| Balance as per last B/S .. | 12,81,401.12 | | |
| *Add :* Donations during the year .. | 53,616.73 | | |
| Interest earned .. | 79,623.15 | 14,14,641.00 | |
| *Less :* Hospital expenses .. | | 57,688.33 | 13,56,952.67 |
| **Education Fund :** | | | |
| Balance as per last B/S .. | 2,29,254.08 | | |
| *Add :* Donations during the year .. | 7,915.50 | | |
| Interest earned .. | 14,708.69 | 2,51,878.27 | |
| *Less :* Scholarship and Sai Leela expenses. | | 14,100.80 | 2,37,777.47 |
| **Devotional Objects Fund :** | | | |
| Donations during the year .. | 3,83,532.23 | | |
| Interest .. | 4,759.96 | 3,88,292.19 | |
| Expenses on religious objects .. | | 72,038.43 | 3,16,253.76 |
| **Depreciation Reserve :** | | | |
| Balance as per last B/S .. | | 4,61,221.44 | |
| *Add :* Transfer from I. & E. A/C. .. | | 48,744.00 | 5,09,965.44 |
| **Investment Fluctuation Reserve :** | | | |
| Balance as per last B/S .. | | | 2,03,900.00 |
| **Gratuity Reserve :** | | | |
| Balance as per last B/S .. | 36,136.50 | | |
| *Add* ; Transfer from I. & E. A/C. .. | 5,968.00 | 42,104.50 | |
| *Less :* Paid .. | | 486.00 | 41,618.50 |
| Carried forward .. | | | 63,99,081.94 |

SANSTHAN, SHIRDI.

as on 31-12-1970.

| ASSETS | | Rs. P. | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|---|---|
| **Lands :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | | 1,29,835.61 |
| **Buildings :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | 14,99,460.55 | |
| Addition during the year | .. | | 1,67,777.50 | 16,67,238.05 |
| **Electric Fittings :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | 60,385.72 | |
| Additions during the year | .. | | 9,450.54 | 69,836.26 |
| **Investments ( at cost )** | | | | |
| **Government Securities and Shares :** | | | | |
| Balance as per last B/S | .. | 12,97,446.59 | | |
| *Add :* Purchases during year | .. | 2,25,500.00 | | |
| | | 15,22,946.59 | | |
| *Less :* Realised | .. | 60,200.00 | 14,62,746.59 | |
| **Fixed Deposits :** | | | | |
| Balance as per last B/S | .. | 21,30,740.08 | | |
| Additions during the year | .. | 3,08,500.00 | 24,39,240.08 | 39,01,986.67 |
| ( Market value of Government Securities and Shares ) ( Rs. 13,11,807.60 ). | | | | |
| **Loan to A. E. Society :** | | | | |
| Balance as per last B/S | .. | | 1,25,000.00 | |
| *Less :* Refund during the year | .. | | 25,000.00 | 1,00,000.00 |
| **Baba's Statue :** | | | | |
| Book Value as per last B/S | .. | | | 4,001.00 |
| **Furniture :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | | 68,918.78 |
| Additions during the year | .. | | | — |
| **Boiler :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | | 4,203.19 |
| **Iron Water Tank :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | | 4,828.50 |
| **Power House Machinery :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | | | 51,877.27 |
| Additions during the year | .. | | | — |
| **Gold and Silver :** | | | | |
| Cost as per last B/S | | 96,241.86 | | |
| Additions during the year | .. | 19,268.96 | 1,15,510.82 | |
| *Less :* Disposed | .. | | 9,473.56 | 1,06,037.26 |
| **Cloths :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | 50,695.56 | | |
| Additions during the year | .. | 58,776.45 | 1,09,472.01 | |
| *Less :* Cost of articles disposed | .. | | 97,460.11 | 12,011.90 |
| Carried forward | .. | | | 61,20,774.49 |

SHRI SAI BABA
BALANCE SHEET

| LIABILITIES | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|
| Brought forward .. | | 63,99,081.94 |
| Deposits .. | | |
| Foundation .. | 24,013.05 | |
| Auditor .. | 7,597.99 | |
| Others .. | 500.00 | |
| .. | 1,791.27 | 33,902.31 |
| **Excess of Income over Expenditure :** | | |
| Balance as per last balance sheet .. | 28,432.42 | |
| *Add :* Transfer from current year's account. | 66,184.95 | 94,617.37 |
| Total : Rs. .. | | 65,27,601.62 |

SANSTHAN, SHIRDI.

as on 31-12-1970.

| ASSETS | | Rs. P. | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|---|---|
| Brought forward.. | | | | 61,20,774.49 |
| **Copper and Brass :** | | | | |
| Cost as per last B/S | .. | 11,396.97 | | |
| Addition during the year | .. | 1,744.25 | 13,141.22 | |
| *Less* : Cost of articles disposed | .. | | 2,308.50 | 10,832.72 |
| **Income-tax deducted at source :** | | | | |
| Balance as per last B/S | .. | 10,247.12 | | |
| Deducted during the year | .. | 2,543.65 | | |
| | | | 12,790.77 | |
| *Less* : Refund received | .. | | 5,900.00 | 6,890.77 |
| **Motor Car :** ( at cost ). | | | | |
| Cost as per books | .. | | | 21,625.85 |
| **Accounts Receivable :** | | | | |
| Staff | .. | | 4,595.00 | |
| Deposits | .. | | 7,294.62 | |
| Contractor | .. | | 8,308.88 | |
| Interest due but not received | .. | | 22,900.00 | |
| Others | .. | | 820.67 | 43,919.17 |
| **Stock at Books :** ( at cost ) | .. | | | 44,180.61 |
| **Stock of Cement :** ( at cost ) | .. | | | 11,588.33 |
| **Hospital Library :** | | | | |
| Costs of Books as per last B/S | .. | | | 440.50 |
| **Hospital Equipment :** ( at cost ) | | | | |
| Cost as per last B/S | .. | | 85,592.88 | |
| Additions during the year | .. | | 3,089.18 | 88,682.06 |
| **Hospital Furniture :** ( at cost ). | | | | |
| Cost as per last B/S | .. | | | 3,042.31 |
| **Cash and Bank Balances :** | | | | |
| In Current Account | .. | | 75,688.79 | |
| In Savings Account | .. | | 31,611.87 | |
| In Postal Savings Book | .. | | 47,042.58 | 1,54,343.24 |
| Cash at Bombay : | | | 1,295.86 | |
| Cash at Shirdi : | .. | | 19,985.71 | 21,281.57 |
| Total Rs. | .. | | | 65,27,601.62 |

Examined and found correct subject to our separate report of even date.

(Sd.) P. G. Bhagwat,
*Chartered Accountants.*
*Bombay* : 21-9-1971.

(Sd.) K. S. Pathak,
*Receiver.*
Shri Sai Baba Sansthan, Shirdi.

| | EXPENDITURE | Rs. P. | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|---|---|
| To | **Expenses in respect of properties:** | | | |
| | Rates, Taxes and Cesses .. | 9,554.98 | | |
| | Insurance .. | 1,991.82 | 11,546.80 | |
| | Repairs and Maintenance .. | 47,982.21 | | |
| | *Less :* Building Fund adjusted. | 14,370.01 | 33,612.20 | |
| | **Depreciation :** | | | |
| | Transfer to depreciation Reserve | | 36,644.00 | 81,803.00 |
| ,, | **Establishment Expenses :** | | | |
| | Receiver's Salary .. | | 9,993.55 | |
| | Office salaries .. | | 92,754.75 | |
| | Provident Fund .. | | 4,880.00 | |
| | Postage .. | | 14,141.48 | |
| | Sundry Expenses .. | | 9,673.95 | |
| | Sundry articles .. | | 1,834.48 | |
| | Licenses and Fees .. | | 27.00 | |
| | Advertisement .. | | 1,446.97 | |
| | Travelling Expenses .. | | 5,173.65 | |
| | Printing Expenses .. | | 7,391.16 | |
| | Uniforms .. | | 2,495.92 | |
| | Power House and Electricity .. | | 29,386.89 | |
| | Gardens .. | | 6,193.73 | |
| | | | 1,85,393.53 | |
| | *Less :* Expenditure met from Trust Corpus .. | | 70,453.94 | 1,14,939.59 |
| ,, | Hospital Expenditure .. | 1,06,100.68 | | |
| | *Less :* Hospital Receipts .. | 48,412.35 | 57,688.33 | |
| | Medical Fund Interest .. | | 57,688.33 | — |
| ,, | Agriculture .. | | | 1,015.24 |
| ,, | Legal expenses .. | | | 1,126.18 |
| ,, | Audit Fees .. | | | 500.00 |
| ,, | Motor Car expenses .. | | | 4,048.42 |
| ,, | Depreciation Transfered to Depreciation Reserve .. | | | 12,100.00 |
| ,, | Gratuity Transfered to Gratuity Reserve .. | | | 5,968.00 |
| ,, | Vault Rent .. | | | 80.00 |
| ,, | **Transfer of donation for Specific Funds to different Funds as per contras :** | | | |
| | Permanent Fund .. | | 25,176.50 | |
| | Building Fund .. | | 8,136.25 | |
| | Medical Fund .. | | 53,616.73 | |
| | Education Fund .. | | 7,915.50 | |
| | Trust Corpus .. | | 45,759.96 | |
| | Devotional Objects Fund .. | | 3,83,532.23 | 5,24,137.17 |
| | | | | 7,45,717.60 |
| | Carried forward .. | | | |

SANSTHAN, SHIRDI.

ACCOUNT for the year ending 31-12-70.

| INCOME | | Rs. P. | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|---|---|
| Rent .. | | | | 18,922.21 |
| Interest .. | | | | 9,890.51 |
| Interest on ear-marked Investments of Fund Transferred to Specific fund as per contras. | | | | |
| Permanent Fund .. | | | 17,690.00 | |
| Building fund .. | | | 14,370.01 | |
| Medical fund .. | | | 79,623.15 | |
| Education fund .. | | | 14,708.69 | |
| Trust Corpus .. | | | 70,453.94 | |
| Devotional Objects Fund .. | | | 4,759.96 | 2,01,605.75 |
| Donations in Cash and kind for Specific funds Transferred to funds as per contras. | | | | |
| Permanent fund .. | | 25,176.50 | | |
| Building fund .. | | 8,136.25 | | |
| Medical fund .. | | 53,616.73 | | |
| Education fund .. | | 7,915.50 | | |
| Devotional Objects fund .. | | 3,83,532.23 | 4,78,377.21 | |
| **Trust Corpus :** | | | | |
| Gold and Silver | 19,268.96 | | | |
| Copper and Brass | 1,744.25 | | | |
| Cloths | 58,776.45 | | | |
| Specific donations | 6,859.00 | 86,648.66 | | |
| *Less :* Deficit on sale of Silver | 1,621.69 | | | |
| Copper and Brass | 157.55 | | | |
| Cloths | 39,109.46 | 40,888.70 | 45,759.96 | 5,24,137.17 |
| **Income from other sources :** | | | | |
| Sundry Receipts .. | | | 22,827.14 | |
| Sale of Books .. | | | 4,230.89 | |
| Sanitation Receipts .. | | | 5,181.49 | 32,239.52 |
| **Poor Feeding** .. | | | 68,522.13 | |
| *Less :* Expenses .. | | | 47,016.90 | 21,505.23 |
| **Charity Boxes** .. | | | | 2,21,878.66 |
| Carried forward .. | | | | 10,30,179.05 |

SHRI SAI BABA
INCOME AND EXPEDITURE

| EXPENDITURE : | Rs. P. | Rs. P. | Rs. P. |
|---|---|---|---|
| Brought forward .. | | | 7,45,717.60 |
| To **Interest on Investments of Specific Funds :** | | | |
| Permanent fund .. | | 17,690.00 | |
| Building fund .. | | 14,370.01 | |
| Medical fund .. | | 79,623.15 | |
| Education fund .. | | 14,708.69 | |
| Trust Corpus .. | | 70,453.94 | |
| Devotional Objects fund .. | | 4,759.96 | |
| | | | 2,01,605.75 |
| ,, **Expenses on objects of Trust :** | | | |
| Sai Leela Magazine .. | 8,744.00 | | |
| *Less :* Receipts .. | 3,390.70 | | |
| | 5,353.30 | | |
| *Add :* Scholarships .. | 7,747.50 | | |
| *Add :* Grants .. | 1,000.00 | 14,100.80 | |
| *Less :* Interest on Education Fund .. | | 14,100.80 | |
| **Expenses on Devotional Objects Fund :** | | | |
| Mandir expenses .. | 26,452.73 | | |
| Naivedya expenses .. | 12,683.15 | | |
| Satyanarayan expenses .. | 20,896.79 | | |
| Festival expenses .. | 12,005.76 | 72,038.43 | |
| *Less :* Expenses met from Devotional Objects Fund .. | | 72,038.43 | |
| **Charity :** | | | 600.00 |
| ,, **Contribution to P.T.A. Fund** .. | | | 16,070.75 |
| ,, Excess of Income over Expenditure Transfered to Balance Sheet .. | | | 66,184.95 |
| Total Rs. .. | | | 10,30,179.05 |

SANSTHAN, SHIRDI.
ACCOUNT for the year ending 31-12-1970.

| INCOME | Rs. P. | Rs. P. |
| --- | --- | --- |
| Brought forward .. | | 10,30,179.05 |
| Total : Rs. .. | | 10,30,179.05 |

Examined and found correct, subject to
our separate report of even date

(Sd.) P. G. Bhagwat,
*Chartered Accountants,*
Bombay : 21-9-1971.

(Sd.) K. S. Pathak,
*Receiver,*
Shri Sai Baba Sansthan, Shirdi.

## SHRI SAI BABA SANSTHAN, SHIRDI.

### STATEMENT SHOWING DETAILS OF INVESTMENTS ALLOCATED TOWARDS DIFFERENT FUNDS.

